# कृषीवल

रायगड, गुरुवार, दि. ९ एप्रिल २०२६

किंमत ४ ₹



**Hiring Graphic Designer**

Fresher

Location: Alibag

Share your resume & portfolio on:
connect@digitrekkers.in


## युवकाची गळफास घेऊन आत्महत्या

**खोपोली :** खोपोलीतील मिळ ठाकूरवाडी येथे एका १६ वर्षीय युवकाने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली. शहाबाज कुरेशी असे युवकाचे नाव आहे. सकाळी कैझाक कुरेशी हे कामावरून घरी आले तेव्हा त्यांना घरी एका खोलीत आपल्याच मुलाने बेडशीटच्या सहाय्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे निदर्शनात आले. घरात तीन बहिणी व आई असतानाही मुलाने गळफास घेतल्याचे सकाळी ८ वाजेपर्यंत कुणाच्याच लक्षात आले नाही. खोपोलीतील मिळ ठाकूरवाडी येथे घडलेल्या प्रकारात आत्महत्या करण्यापूर्वी पहाटे ३ वाजेपर्यंत शहाबाज हा आपली बहीण व आईशी बोलत बसला होता. पान २ वर

## वे|ध|क

### शिक्षकाकडून विद्यार्थिनीवर अत्याचार

**बुलढाणा :** मेहकर तालुक्यातील लोणी गवळी गावातील प्राथमिक शाळेत तिसरीत शिकणाऱ्या एका नऊ वर्षीय विद्यार्थिनीसोबत शिक्षकाने लैंगिक अत्याचार केला. बुधवारी सकाळी साडेदहा वाजताच्या दरम्यान ही घटना घडली. याबाबत नागरिकांना माहीत पडताच शेकडोंचा जमाव शाळेवर चालून गेला. गावातील नागरिक आणि महिलांनी या शिक्षकाला चांगलाच चोप दिला. तात्काळ या घटनेची माहिती डोनगाव पोलिसांना देण्यात आली व पोलिसांनी आरोपी शिक्षक महादेव आत्माराम मानतोडे याला ताब्यात घेतले. मात्र, गावकरी पोलिसांना या शिक्षकाला घेऊन जाण्यास मज्जाव करत होते. दरम्यान, पोलिसांनी गावकऱ्यांची समजूत काढत या आरोपी शिक्षकाला डोनगाव पोलीस स्थानकात नेले.

### दिवेआगरमध्ये पर्यटकांचा राडा

**दिघी :** श्रीवर्धन तालुक्यातील दिवेआगर येथे मंगळवारी (दि.७) रात्री पर्यटकांनी घातलेल्या गोंधळाला विरोध केल्याने स्थानिकांवर जमावाने हल्ला केल्याची गंभीर घटना घडली. या प्रकरणी दिघी सागरी पोलीस ठाण्यात पुण्यातील ११ जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, ही घटना ७ ऑगस्ट २०२६ रोजी रात्री सुमारे ११ वाजण्याच्या सुमारास घडली. दिवेआगर येथील हॉटेल व्यावसायिक ओमकार महादेव धनावडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा नोंदविण्यात आला. फिर्यादीने दिलेल्या माहितीप्रमाणे, काही पर्यटक रात्री उशिरा पान २ वर

### कॉपीराईट उल्लंघन प्रकरणात कारवाई

**पनवेल :** करंजाडे सेक्टर ४ येथील मेडिकल आणि जनरल स्टोअरमध्ये बनावट ब्युटी प्रॉडक्ट्स विक्री केल्याप्रकरणी पनवेल शहर पोलिसांनी कारवाई करत संबंधित दुकानदाराविरुद्ध कॉपीराईट उल्लंघनाचा गुन्हा दाखल केला आहे.मिळालेल्या माहितीनुसार, करंजाडे सेक्टर ४ मधील संकेश्वर मेडिकल आणि जनरल स्टोअरमध्ये एसएमसी गोरी (मेड इन पाकिस्तान) या नावाने बनावट ब्युटी क्रीम, डे-नाईट क्रीम आणि साबण विक्रीसाठी ठेवण्यात आले होते. हे प्रॉडक्ट्स मूळ एसएमसी ब्युटी प्रॉडक्ट्स या ट्रेडमार्क आणि कॉपीराईट असलेल्या कंपनीच्या नावाचा गैरवापर करून तयार करण्यात आले असल्याचे प्राथमिक तपासात उघड झाले. कॉपीराईट पान २ वर

# प्रवास महागला




| रायगड | प्रतिनिधी |

**राज्यात महागाई वाढत असतानाच आता प्रवाशांना आणखी एक मोठा धक्का बसला आहे. एसटीच्या भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. यामुळे प्रवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. एसटी बस अर्थात राज्य परिवहन महामंडळाच्या बस सर्वसामान्य प्रवाशांसाठी मोठा आधार असतात. लांब पल्ल्याच्या प्रवासाठी आजही अनेकजण लालपरीलाच प्राधान्य देतात. एसटीचा प्रवास हा सुरक्षित आणि स्वस्त मानला जातो. प्रवाशांचा एसटी बसच्या प्रवासावर विश्वास आहे. मात्र आता राज्य परिवहन महामंडळानं प्रवाशांना मोठा झटका दिला आहे. एसटी महामंडळाकडून बसच्या भाड्यात हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.**

मुलांच्या शाळेला सुट्ट्या लागल्या आहेत. त्यामुळे अनेक जण उन्हाळ्यात प्रवासाचा बेत आखत असतात. एप्रिल आणि मे या दोन महिन्यांमध्ये एसटी बसमध्ये प्रवाशांची मोठी गर्दी होत असते. मात्र ऐन याच काळात आता एसटी महामंडळाकडून हंगामी भाडेवाढ करण्यात आली आहे. त्याचा मोठा फटका हा आता प्रवाशांना बसण्याची शक्यता आहे. प्रवाशांना भाडेवाढीमुळे झळ बसणार आहे. यामुळे प्रवाशांमधून नाराजी व्यक्त होत आहे.

- **प्रवासी भाड्यात १० टक्क्यांनी केली वाढ**
- **ग्राहकांच्या खिशावर पडणार आर्थिक भार**

एसटी महामंडळाने प्रवासी भाड्यात १० टक्क्यांनी वाढ केली आहे. येत्या १५ एप्रिलपासून प्रवाशांकडून सुधारीत दराने तिकीट आकारण्यात येणार आहे. महागाईमुळे सर्वसामान्य लोक आधीच हैराण आहेत, त्यात आता राज्य परिवहन महामंडळाने देखील प्रवासी भाड्यात वाढ करण्याचा निर्णय घेतल्यानं ग्राहकांच्या खिशावर याचा भार पडणार आहे.

> १५ एप्रिल ते १५ जून या कालावधीसाठी एसटी महामंडळाने भाडेवाढ केली आहे. त्यामध्ये एसटीच्या साध्या बससाठी दहा टक्के वाढ झाली आहे. ही वाढ १५ एप्रिलपासून सुरू होणार आहे.
> – सुनील चौरे, विभागीय नियंत्रक

दरम्यान, एसटी महामंडळाने आता एसटीच्या भाड्यात हंगामी भाडेवाढ करण्याचा निर्णय घेतला आहे. एसटीच्या भाड्यामध्ये १० टक्के वाढ करण्यात आली आहे. येत्या १५ एप्रिलपासून एसटीचे नवे दर लागू होणार आहेत. यावर प्रतिक्रिया देताना प्रवाशांनी चांगलीच नाराजी व्यक्त केली आहे. एसटीच्या या निर्णयावर प्रवाशांकडून संतप्त प्रतिक्रिया उमटत पान २ वर

## कोकणात सत्यशोधक विचारांचा हुंकार

### नव्या पिढीसाठी जागृतीचा निर्धार; शेकाप सरचिटणीस जयंत पाटील यांची उपस्थिती

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

अंधश्रद्धा, अन्याय आणि सामाजिक विषम तेविरोधात विचारांचा आवाज बुलंद होणार आहे. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, रायगड जिल्हा यांच्या वतीने कोकण विभागीय सत्यशोधक परिषद रविवारी (दि.१२) नवीन पनवेल येथे आयोजित करण्यात आली आहे.



के. आ. बांठिया माध्यमिक विद्यालय हॉलमध्ये सकाळी १० ते सायं. ४ या वेळेत होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन खा. सुरेश म्हात्रे (बाळ्या मामा) यांच्या हस्ते होणार असून, हे सत्र नाविन्यपूर्ण आणि प्रेरणादायी ठरणार आहे. या सत्राच्या अध्यक्षस्थानी महा. अंनिसचे राज्य अध्यक्ष माधव बावगे असून शेकापचे सरचिटणीस माजी आ. जयंत पाटील, काँग्रेस प्रदेश सचिव श्रुती म्हात्रे, सुरेखा दळवी यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. परिषदेतील परिसंवाद सत्रात ज्योतिबा फुले ते दि. बा. पाटील वारसा सत्यशोधनाचा या विषयावर विविध मान्यवर आपले विचार मांडणार आहेत. वंचित बहुजन आघाडीच्या प्रदेशाध्यक्षा रेखा ठाकूर, शिवराज्य प्रतिष्ठानचे प्रदेशाध्यक्ष ॲड. रोशन पाटील आणि ज्येष्ठ पत्रकार दिपक म्हात्रे यांचे भाषण या सत्राचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. दुपारनंतर पान २ वर

# आमदारांचे श्रेय राणेंनी फेटाळले

### मच्छिमारांच्या मागणीनुसारच प्रकल्प आणल्याची स्पष्टोक्ती

| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |

अलिबाग तालुक्यातील आक्षी साखर येथे ग्रोयन्स बंधारा, जेट्टी पोहच रस्ता आदी कामांचे भूमीपूजन मत्स्य व्यवसाय व बंदरे विकास मंत्री नितेश राणे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाले. हा प्रकल्प आपल्या मागणीनुसार असल्याचा दावा आमदार दळवी यांनी केला होता. त्यानुसार जाहीरातबाजीदेखील करण्यात आला होती. परंतु नितेश राणे यांनी आमदारांचे श्रेय फेटाळल्याचे समोर आले आहे. पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी मच्छिमारांच्या मागणीनुसार प्रकल्प आणल्याचे स्पष्टोक्ती केली.

विद्यमान आमदार महेंद्र दळवी यांनी अनेक वेळा पान २ वर



अलिबाग परिसरात सुमारे १ हजार १०८ मच्छिमार असून वार्षिक ८ हजार ७४८ टन मत्स्यउत्पादन होते, तर आक्षी साखर येथे ८६३ मच्छिमारांकडून सुमारे २ हजार २९७ टन उत्पादन घेतले जाते. एकदरा खाडीतही मोठ्या प्रमाणावर, सुमारे ११.०४५ टन वार्षिक मत्स्यउत्पादन नोंदवले जाते, अशी माहिती मत्स्यव्यवसाय बंदरे मंत्री-नितेश राणे यांनी सांगितली.

### शिंदे गटाला दणका; आक्षी, साखरमधील असंख्य कार्यकर्ते भाजपमध्ये

केंद्रासह राज्यात महायुतीचे सरकार आहे. जिल्ह्यातदेखील भाजप, राष्ट्रवादी आणि शिंदे गट एकत्र असल्याचे अनेक वेळा भासविले जाते. वेगवेगळ्या कार्यक्रमातून एकत्र येऊन महायुतीत वाद कधीच झाला नाही, असे दाखविले जाते. परंतु महायुतीमधील भाजप आणि शिंदे गटातील अंतर्गत वाद पुन्हा चव्हाट्यावर आले आहेत. महायुतीमधील शिंदे गटातील असंख्य कार्यकर्ते आमदारांच्या कारभारावर नाराज होऊन भाजपमध्ये दाखल झाले आहेत. या भागातील अनेकांनी एका कार्यक्रमाच्या दरम्यान भाजपमध्ये प्रवेश करून शिंदे गटाला दणका दिला आहे.

## मुरूड आगारात सीएनजी पंपाला नकार?

### सर्वेक्षणानंतरही निर्णय होत नसल्याने मुरुडकरांची घोर निराशा

| आगरदांडा | प्रतिनिधी |

मुरूड एसटी आगारात सीएनजी गॅस पंप उपलब्ध नसल्याने मुंबई-पुणे धावणाऱ्या बसेसना अलिबाग वा अन्यत्र गॅस भरावा लागतो. परिणामी प्रवाशांचा खोळंबा होत असुन नियत वेळेवर बसेस पोहचू न शकल्याने प्रवाशांना प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत असल्याची तक्रार होत आहे. मुरुड आगारात सीएनजी गॅस पंप कार्यान्वित व्हावा, अशी मुरुडकरांची वाजवी मागणी होती. तथापि ही मागणी पूर्ण होऊ शकणार नाही, असे कळल्याने सीएनजी गॅस पंप सुरु होण्याची शक्यता आता धुसर झाली आहे.

मुरूड- जंजिरा हे कोकणातील एक महत्त्वाचे पर्यटन केंद्र असून ऐतिहासिक जंजिरा किल्ला, पद्मदुर्ग, समुद्रकिनारे, निसर्गसौंदर्य आणि येथील समृद्ध खाद्यसंस्कृतीच्या आकर्षणामुळे दरवर्षी लाखो पर्यटक इथे येत असतात. सर्वच पर्यटक खासगी वाहनांनी येतात असे नाही. अनेक पर्यटक सुरक्षित प्रवासाची हमी असलेल्या लालपरीला पसंती देतात. मात्र अशा ठिकाणी सीएनजी पंपाचा अभाव असल्याने मुरुड आगारातील एसटी बस सेवेचे टाईम मॅनेजमेंट जुळवताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे चित्र आहे. मुरुड आगारात आतापर्यंत ७ नवीन बस सोडल्या तर उर्वरित ३० गाड्या सीएनजी वरच धावत असून गॅस भरण्यासाठी त्यांना अलिबाग वा अन्यत्र थांबण्याखेरीज पर्याय नसल्याने वाहक-चालकांना प्रवाशांकडून पान २ वर




## एमपीएससी राज्यसेवेचा निकाल जाहीर

- **सोलापूरचा विजय लामकाने आला राज्यात पहिला**
- **आरती जाधव महिलांमध्ये पहिली**

| नागपूर | प्रतिनिधी |

महाराष्ट्र लोकसेवा अयोगातर्फे (एमपीएससी) २७ ते २९ मे, २०२५ या कालावधीत घेण्यात आलेल्या राज्य सेवा (मुख्य) परीक्षा-२०२४ चा अंतिम निकाल ८ एप्रिल, २०२६ रोजी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आला आहे. त्यानुसार विविध २० संवर्गातील एकूण ४६१ पदांवर उमेदवारांची शिफारस करण्यात येत आहे. या परीक्षेमध्ये सोलापूर जिल्हातील विजय नागनाथ लामकाने हे सर्वसाधारण तथा मागासवर्ग उमेदवारांमधून राज्यात प्रथम तर सोलापूर जिल्ह्यातील आरती परमेश्वर जाधव या महिलांमधून राज्यात प्रथम आल्या आहेत. अंतिम निकाल जाहीर न झाल्याने उमेदवारांच्या मुलाखती रखडल्या होत्या.

उमेदवारांच्या माहितीसाठी प्रस्तुत निकाल व प्रत्येक प्रवर्गासाठी शिफारसपात्र ठरलेल्या शेवटच्या उमेदवाराचे गुण (सीमांकन गुण) आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आले आहेत. प्रस्तुत निकालाद्वारे पान २ वर

## सुनेत्रा पवारांच्या जीवाला धोका

| मुंबई | प्रतिनिधी |

बीड जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात सध्या एका निनावी पत्रामुळे मोठी ख ळ ब ळ उडाली आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्या जीवितास आणि प्रतिष्ठेस धोका असल्याचा खळबळजनक दावा एका पत्रातून करण्यात आला आहे.



अजित पवार गटाच्या बीड जिल्हाध्यक्षा प्रज्ञा खोसरे या भोंदू बाबा अशोक खरातच्या हस्तक असून त्यांच्यापासून सुनेत्रा पवार यांना धोका असल्याचे यात नमूद करण्यात आले आहे. या पत्रानंतर प्रज्ञा खोसरे यांनी आक्रमक पवित्रा घेत हे सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. तसेच संबंधितांविरुद्ध मानहानीचा दावा दाखल करण्याचा इशारा दिला आहे.

**प्रज्ञा खोसरे यांचे प्रत्युत्तर**


या आरोपांनंतर प्रज्ञा खोसरे यांनी त्यांची प्रतिक्रिया दिली आहे. कुठलाही ठोस पुरावा नसताना केवळ निनावी पत्र व्हायरल करून माझी बदनामी केली जात आहे. मी अशोक खरातचा जाहीर निषेध करते आणि त्याला कडक शिक्षा व्हायला हवी, हीच माझी भूमिका आहे. काही लोक राजकीय हेतूने प्रेरित होऊन खालच्या दर्जाची टीका करत आहेत, असे प्रज्ञा खोसरे यांनी म्हटले.

या पत्रात प्रज्ञा खोसरे यांच्यावर अनेक गंभीर आरोप करण्यात आले आहेत. प्रज्ञा खोसरे या भोंदू बाबा अशोक खरात यांच्या प्रतिनिधी म्हणून काम पाहत आहेत. त्या महिलांना त्याच्याकडे नेण्याचे काम करतात. प्रज्ञा खोसरे यांनी स्वतःच्या भावाच्या पत्नीचा हुंड्यासाठी छळ केला असून, त्याबाबत बीडच्या शिवाजी नगर पोलीस स्टेशन येथे २००९ मध्ये एफआयआर नोंदवण्यात आला आहे. त्यांनी स्वतः ४-५ वेळा गर्भलिंग निदान करून गर्भपात केल्याचा आणि बीड जिल्ह्यातील इतर महिलांनाही पुत्रप्राप्तीसाठी किंवा गर्भलिंग निदानासाठी विविध डॉक्टरांकडे नेल्याचा खळबळजनक आरोप या पत्राद्वारे करण्यात आला आहे. यामुळे त्यांना तातडीने सर्व पदांवरून हटवण्यात यावे, अशी मागणी या पत्रातून केली आहे.

## शेकापचे सहचिटणीस यशवंत ठाकूर यांना पत्नीशोक

| अलिबाग | विशेष प्रतिनिधी |

उरण तालुका शेतकरी कामगार पक्षाचे सहचिटणीस यशवंत हरिश्चंद्र ठाकूर यांच्या पत्नी सावित्री ठाकूर यांचे ४ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या निधनाने उरण तालुक्यातील सामाजिक व राजकीय क्षेत्रात एक समर्पित, जिव्हाळ्याची व जनतेशी नाळ जुळलेली व्यक्ती हरपली असल्याची खंत नागरिकांनी व्यक्त केली.



कै. सावित्री ठाकूर या ङ्गताईफ या नावाने सर्वत्र परिचित होत्या. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी आपल्या कुटुंबासह समाजसेवेची परंपरा जपली. पक्षनिष्ठा आणि समाजाबद्दलची बांधिलकी यांचा उत्तम समन्वय त्यांच्या कार्यात नेहमी दिसून येत असे. यशवंत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त गेली ३१ वर्षे गरजू व गरीब विद्यार्थ्यांना खाऊ, वह्या व पुस्तकांचे वाटप करण्याचा उपक्रम त्यांनी सातत्याने राबवला. त्यांचे सासर व माहेर दोन्ही कुटुंबांचा भारतीय शेतकरी कामगार पक्षाशी पिढ्यानपिढ्या असलेला एकनिष्ठ संबंध त्यांनी अभिमानाने जपला. अंत्ययात्रेसमयी त्यांच्या अंगावर पक्षाची निशाणी असलेली शाल असणे, ही त्यांच्या पक्षनिष्ठेची साक्ष आहे. उरण तालुक्यातील तसेच बोकडविरा गावातील विविध पान २ वर

**पर्यटन व्यवसायाला चालना | २३१ पिल्लांचा अरबी समुद्रात यशस्वी प्रवास**

# वेळासमध्ये कासव महोत्सवाचा श्री गणेशा

| रत्नागिरी | प्रतिनिधी |


कासवांचे गाव म्हणून जगप्रसिद्ध असलेल्या वेळास (ता. मंडणगड) येथील समुद्रकिनाऱ्यावर यावर्षीचा कासव महोत्सव एप्रिल महिन्यात दिमाखात सुरू झाला आहे.

कांदळवन विभागाच्या वतीने राबवण्यात येत असलेल्या कासव संरक्षण आणि संवर्धन मोहिमेला मोठे यश आले असून, आतापर्यंत अंड्यातून बाहेर पडलेली २३१ पिल्ले सुरक्षितपणे समुद्राच्या पाण्यात सोडण्यात आली आहेत. वातावरणातील बदलामुळे यंदा विणीचा हंगाम काहीसा लांबला असला, तरी पिल्लांचा जन्म सोहळा पाहण्यासाठी पर्यटकांची पावले मोठ्या संख्येने वेळासकडे वळू लागली आहेत, ज्यामुळे स्थानिक पर्यटन व्यवसायालाही चांगली चालना मिळत आहे.

सागरी जैवविविधतेचा महत्त्वाचा दुवा असलेल्या ऑलिव्ह रिडले कासवांचे संवर्धन करण्यासाठी कांदळवनविभागानेस्थानिककासव मित्रांच्या मदतीने किनाऱ्यावर ३२ कृत्रिम घरटी (हॅचरीज) उभारली आहेत. वन्यप्राण्यांपासून संरक्षण आणि भरतीच्या पाण्याचा धोका टाळण्यासाठी नैसर्गिक पद्धतीने ही घरटी तयार करण्यात आली असून, त्यात एकूण ३,३२३ अंडी संरक्षित करण्यात आली आहेत. मॅंग्रोव्हजचे आर.एफ.ओ. किरण ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम राबवली जात आहे. सागरी पर्यावरण स्वच्छ ठेवण्यात कासवांची भूमिका अत्यंत मोलाची असल्याने, त्यांच्या अंड्यांची चोरी किंवा शिकार रोखून सुरक्षित पुनरुत्पादन करण्यावर विभागाने विशेष भर दिला आहे.

दरम्यान, वेळास समुद्रकिनाऱ्याचे महत्त्व लक्षात घेऊन या परिसराला समुद्री कासव संवर्धन राखीव क्षेत्र म्हणून घोषित करण्याच्या हालचालीही प्रशासकीय पातळीवर सुरू आहेत. पश्चिम किनारपट्टीवरील हे महत्त्वाचे प्रजनन स्थळ टिकवण्यासाठी वन विभाग आणि ग्रामस्थ सातत्याने प्रयत्नशील आहेत.

**गेल्या काही वर्षांच्या तुलनेत यंदा कासवांच्या विणीच्या वेळापत्रकात बदल दिसून येत आहे. २०२१ पर्यंत सप्टेंबरमध्ये सुरू होणारा अंडी संरक्षणाचा हंगाम आता जानेवारी-फेब्रुवारीपर्यंत लांबला आहे. यावर्षी ४ जानेवारी रोजी पहिले घरटे आढळून आले होते, परिणामी मार्चऐवजी एप्रिलमध्ये कासवांचा जन्मसोहळा सुरू झाला आहे.**



## बनावट विद्यार्थी अन् शाळांना आळा

### पहिली ते अकरावीच्या विद्यार्थ्यांची होणार पटपडताळणी

| रायगड | प्रतिनिधी |


बनावट विद्यार्थी व शाळा शोधण्यासाठी शिक्षण संचालनालयाकडून यंदा पटपडताळणी करण्यात येत आहे. त्यानुसार इयत्ता दुसरी, नववी आणि अकरावीच्या विद्यार्थ्यांची पटपडताळणी करण्यात येणार आहे. मात्र ही पटपडताळणी नियतकालिक मूल्यांकन चाचणीच्या परीक्षेच्या दिवशी घेणार आहे. तसेच यंदा इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांचीही पटपडताळणी होणार आहे.

शिक्षण संचालनालयाकडून यंदा पुन्हा पटपडताळणी करण्याचा निर्णय घेतला आहे. यापूर्वी २०१३ व २०१५ मध्ये पटपडताळणी करण्यात आली होती. त्यावेळी



अनेक बनावट शाळा व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात सापडले होते. त्याचधर्तीवरयंदापुन्हापटपडताळणी करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यानुसार प्रथम इयत्ता दुसरी ते आठवी, नववी आणि अकरावीचे हजेरीपट, प्रत्यक्ष उपस्थिती पडताळण्यात येणार होती. मात्र ही पटपडताळणी पॅट परीक्षेच्या दिवशी म्हणजे ११, १५ आणि २२ एप्रिल रोजी होणार आहे. परीक्षेच्या कालावधीमध्ये ही पटपडताळणी होणार असल्याने शिक्षकांकडून याविरोधात संताप व्यक्त करण्यात येत होता. आता ही पटपडताळणी पान २ वर

## निवडक



### कोंडविल समुद्रकिनारी सीआरझेडचे उल्लंघन

**श्रीवर्धन :** तालुक्यात सध्या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना सुगीचे दिवस आले आहेत. महसूल प्रशासनाचे कोणतेही भय या अनधिकृत बांधकाम करणाऱ्यांना राहिलेले नाही. ज्याला वाटेल त्या ठिकाणी बांधकाम करण्याचे उद्योग सुरू आहेत. असाच एक प्रकार श्रीवर्धन तालुक्यातील कोंडविल समुद्रकिनारी घडला आहे. या ठिकाणी कोयला नावाचे हॉटेल भरती रेषेवरच बांधकाम करून बांधण्यात आलेले आहे. याबाबत या ठिकाणाची ग्रामपंचायत, तलाठी, सर्कल या कोणाचेच कसे लक्ष गेले नाही, अशी शंका स्थानिकांमधून व्यक्त केली जात आहे. एकेकाळी निर्मनुष्य असलेला श्रीवर्धन तालुक्यातील कोंडविल हा समुद्रकिनारा आता अनधिकृतपणे बांधण्यात आलेली हॉटेल्स व स्टॉल्स यामुळे गर्दीने फुललेला पाहायला मिळतो. या समुद्रकिनारी बांधण्यात आलेल्या बहुतेक हॉटेल मालकांनी वनखात्याच्या जागेतून मार्ग काढलेला आहे. परंतु, वनविभागाचे अधिकारी यावर कोणत्याही प्रकारची कारवाई करायला तयार नाहीत. काही महिन्यांपूर्वी याच अरावि कोंडविल किनाऱ्यावरती श्रीवर्धन बाहेरील काही नागरिकांनी येऊन, स्टेज बांधून लग्न लावण्याचा प्रकार देखील घडला होता. मात्र, अनधिकृत बांधकामाचे एवढे गंभीर प्रकार घडत असताना श्रीवर्धन महसूल विभाग कारवाई का करत नाही? असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

### खिशातून पैशांसह मोबाईलची चोरी

**नवीन पनवेल :** बत्तीस वर्षीय तरुणाच्या हाताला चावा घेऊन आणि धारदार वस्तूने वार करून खिशातून ५ हजार रुपये आणि मोबाईल खेचून पळून गेल्या प्रकरणी पनवेल शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शेख रोशन शेख चांद हा यवतमाळ येथे राहत असून तो ट्रक मालकासह भिवंडी-ठाणे येथे माल भरण्यासाठी आला होता. दि.२ एप्रिल रोजी ते औरंगाबाद व नागपूर येथे जाण्यासाठी निघाले. सायंकाळी साडेपाचच्या सुमारास कामानिमित्त पनवेल येथे आले होते. ते रिक्षा पकडण्यासाठी गांधी हॉस्पिटलच्या समोरील कामगार नाका येथे आले असता त्यांच्या पाठीमागून एक व्यक्ती आला आणि त्यांनी त्याच्या खिशातून पैसे काढण्याचा प्रयत्न केला. यावेळी प्रतिकार केला असता त्या व्यक्तीने त्याच्या हाताला चावा घेतला आणि चाकूने वार केला. त्यानंतर खिशात जबरदस्तीने हात घालून ५ हजार रुपये आणि मोबाईल फोन काढून घेऊन तो पळून गेला. यात शेख रोशन शेख चांद हा जखमी झाला.

### मजगाव मराठी शाळेत सायकल वाटप



**आगरदांडा :** मजगाव येथील जिल्हा परिषद शाळेत ऐनजीओ इनर व्हील क्लब ऑफ बॉम्बे पियर यांच्या सौजन्याने ४१ विद्यार्थ्यांना सायकलींचे वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शाळेत ये-जा करण्यासाठी सोयीस्कर सुविधा उपलब्ध करून देणे हा होता. गरीब मुलं-मुली यांना शिकण्याची प्रेरणा मिळावी, यासाठी हा विशेष उपक्रम सस्थेमार्फत राबवला जातो. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ऐनजीओ इनर व्हील क्लब ऑफ बॉम्बे पियरच्या उपासना साबू, मारिया लोखंडवाला, निशरीन शम्झ, मुनिरा काठावाला तसेच शिक्षक बाळासाहेब फुंदे, चेतन चव्हाण, स्वप्नाली बाजी, मुख्याध्यापिका रेश्मा धुमाळ, शाळाव्यवस्थापन समिती अध्यक्ष व सदस्य, पालक वर्ग यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. यावेळी गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांची निवड करून त्यांना सायकलींचे वाटप करण्यात आले.विद्यार्थ्यांनी सायकली मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त केला.

### खारघरमध्ये दोन रात्री विजेचा लपंडाव

**पनवेल :** सलग दोन रात्री वीजपुरवठा खंडित झाल्याने खारघरमधील हजारो नागरिकांना अंधार, उकाडा आणि डासांच्या त्रासाचा सामना करावा लागला. अचानक बिघडलेल्या महावितरणच्या व्यवस्थेमुळे उपनगरातील अनेक भागांमध्ये वीज पुरवठा खंडित झाला. त्यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.रविवारी रात्री सुमारे अकराच्या सुमारास गेलेली वीज सोमवारी पहाटेपर्यंत सुरळीत झाली नव्हती. त्यानंतर सोमवारी रात्री पुन्हा सेक्टर १९ व २० परिसरात वीजपुरवठा खंडित झाला आणि मध्यरात्री उशिरा तो पूर्ववत करण्यात आला. महावितरणच्या वीज व्यवस्थेत अचानक झालेल्या तांत्रिक बिघाडामुळे ही परिस्थिती निर्माण झाली. विशेष म्हणजे रविवारी मध्यरात्री तळोजा औद्योगिक वसाहतीतही वीजपुरवठा खंडित झाला होता. याबाबत खारघर परिसरातील नागरिकांनी महावितरणकडे तक्रार करून उन्हाळ्यात वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, महावितरणच्या खारघर विभागाचे उपकार्यकारी अभियंत्यांनी सांगितले की, सोमवारी उपकेंद्रात अचानक तांत्रिक बिघाड झाल्यानंतर तातडीने तंत्रज्ञ आणि कामगारांच्या मदतीने दुरुस्तीचे काम पूर्ण करून वीजपुरवठा सुरू करण्यात आला. तसेच, ४० केव्ही पुरवठा लाईनमध्ये अडचण निर्माण झाल्याने पर्यायी व्यवस्था उभी करून दोन तासांत वीजपुरवठा पूर्ववत करण्यात आला.

### द्रोणागिरी किल्ला विक्रीचा डाव?

**उरण :** डोंगरावर उभा असलेला ऐतिहासिक द्रोणागिरी किल्ला आता थेट 'विक्रीच्या बोलीत' निघाल्याची चर्चा रंगू लागली आहे. यामागे नेमका कोणाचा हात आहे? असा संतप्त सवाल उरणकरांनी उपस्थित केला आहे. द्रोणागिरी किल्ला केवळ एक वास्तू नसून उरणच्या अस्मितेचा कणा आहे. देवगिरीच्या यादवांपासून ते पोर्तुगीज, आदिलशहा आणि इंग्रजांच्या सत्तेला साक्षी असलेला हा गड १० मार्च १७३९ रोजी मानाजी आंग्रे यांनी जिंकून स्वराज्याच्या इतिहासात भर घातली होती. तर, पौराणिक मान्यतेनुसार हनुमान संजीवनी बुटीचा पर्वत घेऊन जात असताना त्यातील काही अंश येथे पडले. अशा धार्मिक, ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारशाचा ठेवा असलेली ही भूमी आज विक्रीच्या चर्चेत येणं म्हणजे महाराष्ट्राच्या स्वाभिमानावर थेट आघात असल्याची भावना व्यक्त होत आहे. मात्र, या सर्व गंभीर पार्श्वभूमीवरही प्रशासन आणि लोकप्रतिनिधींची संशयास्पद शांतता नागरिकांच्या जखमेवर मीठ चोळणारी ठरत आहे.

# उरणची तरुणाई नशेच्या खाईत

## ।। नशिल्या पदार्थांची खुलेआम विक्री ।। प्रशासनाच्या निष्क्रियतेमुळे 'नशेचे साम्राज्य' माजले


| घन:श्याम कडू |
| उरण |

उरण तालुक्यातील तरुणाई अंमली पदार्थांच्या चंगुळात सापडत चालली आहे. शाळा-कॉलेजच्या ५०० मीटर परिसरात तंबाखूजन्य पदार्थांची विक्री करण्यास कायद्याने मनाई असतानाही उरण शहरात या नियमांचा खुला धिंडोरा पिटला जात आहे. सिगारेट, गुटखा, चरस, गांजा यांसारख्या नशिल्या पदार्थांची खुलेआम विक्री होत असल्याने विद्यार्थी मोठ्या प्रमाणात व्यसनाधीन होत आहेत आणि त्यांचे आयुष्य डोळ्यासमोर उद्ध्वस्त होताना दिसत आहे. त्यामुळे याला शाळा-कॉलेज प्रशासनाचे दुर्लक्ष, पोलिसांची निष्क्रियता आणि काही अधिकाऱ्यांचा हप्त्याचा लोभा जबाबदार ठरत असल्याचे पालकांमधून बोलले जात आहे.

उरणमधील एका नामांकित शाळेतील कॉलेजमधील एका युवकाच्या खिशातून गांजा सापडल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. परंतु, शाळेची प्रतिमा मलिन होऊ नये म्हणून या गंभीर प्रकारावर शाळा प्रशासनाने पूर्णपणे पडदा टाकला. शाळेची अब्रू वाचवण्यासाठी विद्यार्थ्याचे आयुष्य धोक्यात घालण्याची भूमिका घेतली जात असल्याचा संताप पालकवर्गातून व्यक्त केला जात आहे. गांजा सापडल्याची माहिती मिळताच प्रशासनातील एकाने आम्हाला माहिती नाही, अशी भूमिका घेतली होती. तर, दुसऱ्याने नशेसारखे काहीतरी होते, पण नशिली वस्तू नव्हती, अशी विचित्र सफाई देऊन प्रकरण धुऊन टाकण्याचा प्रयत्न केला.

दरम्यान, या सर्व घडामोडींना पिरवाडी समुद्रकिनारी दिसणाऱ्या दृश्यांनी अधिक भयंकर रूप मिळाले आहे. या ठिकाणी सकाळच्या वेळेस शाळेच्या गणवेशातील विद्यार्थी-विद्यार्थिनी तोंडात गुटखा, ओठांत सिगारेट आणि हातात दारूची बाटली घेऊन नशेत बसलेले दिसतात. पिरवाडी किनाऱ्यावरील बेकायदेशीर टपरीवर खुलेआम नशिल्या पदार्थांची विक्री होत असून, हे ठिकाण तरुणाईच्या नशेच्या अड्ड्यात परिवर्तित झाले आहे. काही महिन्यांपूर्वी तर एका प्राचार्यांच्या मुलीने नशेच्या अवस्थेत वाहन चालवून अपघात घडवला होता. तिच्याकडे वाहन चालवण्याचा परवाना नसतानाही एकाही अधिकाऱ्याने तिच्यावर गुन्हा नोंदवला नाही. सामान्य नागरिक असता तर गजाआड करण्याची घाई करणारे अधिकारी या प्रकरणात मात्र संपूर्णत: शांत राहिले. या कारवाईशून्य भूमिकेमुळे नशेच्या प्रकरणांत अजून दहशत माजली आहे.

सर्वात भयानक बाब म्हणजे शहरातील अनेक टपऱ्यांवर खुलेआम गुटखा, चरस, गांजा, दारू यांची विक्री सुरू असून काही टपऱ्या तर शाळा आणि पोलीस ठाण्याच्या केवळ १०० मीटर अंतरावर आहेत. या टपरीवाल्यांकडून आम्ही अधिकारी वर्गाला हप्ता देतो, त्यामुळे आमच्यावर कोणी कारवाई करू शकत नाही, अशी उघड धमकीसमान गर्वोक्ती केली जात असल्याचे नागरिकांकडून समोर आले आहे. यावरून उरणमधील नशेची उलाढाल दिवसाला लाखोंमध्ये होत असूनही पोलिस-प्रशासन कारवाई करू इच्छित नसल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.



**प्रशासनाचे दुर्लक्ष**
उरण नशेचे जाळे एवढे खोलवर पसरले आहे की आजची तरुणाई व्यसनाच्या विळख्यात सापडून मानसिक, शारीरिक, शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या कोसळत आहे. शाळा-कॉलेज प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे, पोलिसांच्या निष्क्रियतेमुळे आणि काही अधिकाऱ्यांच्या हप्त्याच्या लोभामुळे हे नशेचे साम्राज्य दिवसेंदिवस विस्तारत चालले आहे. त्यामुळे पालक वर्गात प्रचंड चिंतेचे वातावरण असून त्यांच्यात तीव्र नाराजी उसळली आहे. त्यामुळे उरणच्या तरुणाईला नशेच्या रेट्यातून वाचवण्यासाठी कडक कारवाई, बेकायदेशीर टपऱ्यांवर तातडीचे धाड, शाळा-कॉलेज प्रशासनाला जबाबदार धरून चौकशी, आणि पोलीस विभागावर नियंत्रण येणे अत्यावश्यक आहे. अन्यथा उरण तालुका नशेच्या अंध:कारात बुडायला कोणतीही वेळ लागणार नाही, असे पालक वर्गातून बोलले जात आहे.

## रायगडात अवैध मद्य विक्रीला उत

| पनवेल | प्रतिनिधी |

शासनाने मद्य विक्रीकरीता वाईन शॉप, बियरबार परमिट रूम व बियर शॉपी धारकांना कडक नियमावलीच्या आधारे मद्य विक्रीचे परवाने दिले आहेत. त्या नियमावलीला अनुसरून मद्य विक्रेते आपला व्यवसाय करीत असतात. परंतु, जिल्ह्यात काही ठिकाणी राज्य उत्पादन शुल्क अधिक्षकांच्या आशिर्वादानेच ढाब्यांवरच दारूची अवैधरीत्या विक्री केली जात आहे. असा आरोप अधिकृत मद्य विक्री परवाना प्राप्त धारकांकडुन केला जात आहे.

काही वाईन शॉप व बिअर बार परमिट रूम वाल्यांनी सांगीतले की, आम्ही भरमसाठ भाडे जागा मालकाला देऊन व लाखो रुपये शासनाची फी भरून सद्य स्थीतीत गल्ली बोळात अवैध दारू विक्री केंद्र बोकाळले आहेत. त्यामुळे आम्ही आर्थीक संकटात आहोत. मार्चमध्ये दर वर्षी आमचा परवाना नुतनीकरण करताना शासकीय फी व दप्तर तपासणी कडक रीत्या केली जाते. परंतु, अवैध ढाबे, दारूचे गुत्ते यांना मात्र महीन्याकाठी राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक यांनी हप्ते बांधुन घेतल्याने त्यांना मोकळीक दिली जात आहे, असा आरोप देखील त्यांच्याकडून केला जात आहे. नागोठणे येथील जिंदाल कंपनीच्या परीसरात ज्या टपरीधारकांनी आपले साम्राज्य उभे केले आहे, तीथे तर चक्क टपरीवर अवैध दारूची खुलेआम विक्री होत असल्याची चर्चा आहे. मात्र, अधिक्षक साहेबांमुळे कर्तव्यदक्ष कनिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांना ठोस कारवाई करता येत नसल्याचे खाजगीत बोलले जात आहे. पनवेल, पेण, नागोठणे, महाड, गोरेगाव, म्हसळा, श्रीवर्धन, रोहा, कर्जत, उरण या तालुक्यात अवैध ढाबा संस्कृती फोफावल्याने अधिकृत परवाने धारकांत राज्य उत्पादन शुल्क अधिक्षक रायगड यांच्या प्रती नाराजी व्यक्त केली जात आहे.

## क्रेडिट कार्डमधून ऑनलाइन फसवणूक

**नवीन पनवेल :** क्रेडिट कार्ड मंजूर झाल्याचे सांगून लिंक पाठवली आणि क्रेडिट कार्डमधून १ लाख ३९ हजार रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. आहे. बबन शिंदे हे कामोठे सेक्टर ३६ येथे राहत असून त्यांना अनोळखी व्यक्तिकडून फोन आला. आणि बँकेचे क्रेडिट कार्ड मंजूर झाले असून व्हाट्सअप द्वारे लिंक पाठवतो असे सांगितले. त्यानंतर ती लिंक उघडून माहिती भरण्यास सांगितली. त्यानंतर लिंकमध्ये माहिती भरत असताना बबर शिंदे यांना शंका आल्याने त्यांनी ती लिंक बंद केली आणि त्या व्यक्तीचा फोन कट केला. परंतु, अर्ध्या तासानंतर त्यांना ओटीपी आला आणि मोबाईल क्रमांकावर रक्कम वजा झाल्याचे मेसेज आले.

# घाऊक बाजारात हापूसची आवक कमीच

| नवी मुंबई | प्रतिनिधी |

आंब्याचा सिझन सुरू झाला तरी वाशीच्या घाऊक बाजारात कोकणातून हापूस आंब्याची हवी तशी आवक होत नाही. आताही बाजारात केवळ सरासरी ३० हजार पेट्यांचीच आवक बाजारात होत आहे. त्यामुळे मुख्य हंगाम सुरू झाला तरी बाजारात हवे तसे हापूस आंबे बघायला मिळत नाहीत. एकूणच कोकणातील आंब्याची परिस्थिती पाहता उत्पादन यावर्षी कमीच आहे. त्यामुळे बाजारात हापूस आंब्याची आवक कमी होत आहे. मात्र, दि. १० एप्रिल नंतर कोकणातील हापूस आंब्याची आवक वाढणार असल्याचा विश्वास व्यापाऱ्यांनी व्यक्त केला आहे.

फेब्रुवारी ते मार्च आणि एप्रिल ते मे हा कोकणातील हापूस आंब्याचा मुख्य हंगाम आहे. मात्र, यावेळी फेब्रुवारी ते मार्च हा पहिला हंगाम बाजारात आंबा नसल्याच जमा होता. आता हापूस आंब्याचा दुसरा आणि मुख्य हंगाम सुरू होण्याचा कालावधी सुरू झाला आहे. तरी देखील बाजारात हवा तसा हापूस आंबा पहायला मिळत नाही. दरवर्षी घाऊक बाजारात एप्रिलच्या सुरुवातीला सरासरी ५० ते ६० हजार हापूस आंब्याच्या पेटी दाखल होत असतात आणि त्यानंतर ही आवक आणखीन वाढत ८० हजार पेट्यांपर्यंत जाते. मात्र, यावेळी चित्र बदलले आहे. लहरी आणि बदलत्या हवामानाचा फटका बसल्याने यावर्षी कोकणातील ७० टक्के हापूस आंब्याचे नुकसान झाले आहे. त्यामुळे हापूसची आवक कमीच आहे. त्यामुळे एप्रिल महिन्यात ही बाजारात हापूस आंबा कमीच आहे. परिणामी यावर्षी हापूस आंब्याचे दर ही चढेच आहेत. घाऊक बाजारात हापूस आंब्याची दोन डझन हापूस आंब्याच्या पेटीला २ हजारांपासून ते ६ हजाराचा दर आहे. हा कच्च्या आंब्याचा पेटीचा दर आहे. पिकलेल्या तयार हापूस आंब्याच्या पेटीचा दर या दरापेक्षा दुप्पट आहे. आंब्याच्या आकारानुसार दर आकारला जात आहे. उत्पादन कमी असल्याने यावर्षी आंबा व्यापाऱ्यांचे मोठे नुकसान होत आहे. त्यांना हवा तसा व्यापार करता येत नाहीय. परिणामी यावर्षीचा आंब्याचा हंगाम व्यापाऱ्यांसाठी तोट्यात असल्याचे व्यापारी सांगत आहेत.



● (संग्रहीत छायाचित्र)

**व्यापारावर परिणाम**
यंदा आंब्याचे उत्पादन कमी आहे. त्यामुळे घाऊक बाजारात हापूस आंब्याची आवक कमी आहे. आवक कमी असल्याने व्यापारावर त्याचा परिणाम होत आहे. १० एप्रिल पासून आंब्याची आवक काही प्रमाणात वाढण्याची शक्यता आहे. ही आवक वाढल्यास व्यापाऱ्यांना त्याचा फायदा होईल. शिवाय आंबा खवय्यांना हापूस आंब्याची चांगली चव चाखता येईल, असे एपीएमसीमधील व्यापारी संजय पिंपळे यांनी सांगितले.

## १२५ बीएलओंना कारणे दाखवा नोटिसा

| पनवेल | प्रतिनिधी |

निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार पनवेल विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांची नेमणूक करण्यात आली आहे. मात्र, निवडणूक कामासाठी उपस्थित न राहिल्याबाबत मतदार नोंदणी अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांनी तब्बल १२५ शिक्षकांना कारणे दाखवा नोटिसा बजावल्या आहेत.

पनवेल विधानसभा मतदारसंघातील सर्व केंद्रस्तरीय अधिकारी यांनी मतदारांचे मॅपिंग करणे, मतदार यादीतील अस्पष्ट फोटो असलेल्या मतदारांचे रंगीत फोटो घेऊन अद्ययावत करणे, डीएसईच्या नोंदीचे पडताळणी करणे इत्यादी कामांसाठी दि.१८ मार्च ते १५ एप्रिल या कालावधीसाठी पूर्ण वेळ कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्यांना निवडणुकीच्या कामकाज करण्यासाठी सुचित करण्यात आले आहे. पनवेलमधून शिक्षक, शासकीय कर्मचारी आणि अंगणवाडी सेविका असे एकूण ५७४ बीएलओची नियुक्ती करण्यात आली आहे. तसेच, १२ नोडल ऑफिसर, ५७ सुपरवायझर आणि पाच एइआरओ यांची नियुक्ती करण्यात आली होती.

## ३३ वर्षीय तरुण बेपत्ता

**पनवेल :** खांदा कॉलनी परिसरातील ३३ वर्षीय तरुण अल्पेश अशोक बेंडखळे हे ७ एप्रिल रोजी घरातून बाहेर पडून बेपत्ता झाले आहेत. त्यांची उंची सुमारे ५ फूट ३ इंच असून ते शेवटचे खांदा कॉलनी येथे दिसून आले होते. त्यानंतर त्यांचा काहीही संपर्क झालेला नाही. कुटुंबीयांनी सर्वत्र शोध घेतला मात्र अद्याप त्यांचा ठावठिकाणा लागलेला नाही. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात नोंद करण्यात आली असून पोलिसांकडून शोधमोहीम सुरू आहे. दरम्यान, नागरिकांनीही सतर्क राहून कोणाला अल्पेश बेंडखळे दिसल्यास तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन कुटुंबीयांकडून करण्यात आले आहे.

# सुधागडात गॅस सिलिंडर थेट दारी

| सुधागड-पाली | प्रतिनिधी |

ग्रामीण भागातील नागरिकांना गॅस सिलिंडरसाठी करावी लागणारी पायपीट, सोसावा लागणारा विलंब आणि आर्थिक भुर्दंड थांबवण्यासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने आक्रमक पवित्रा घेतला आहे. मनसेच्या पाठपुराव्याला यश आले असून बुधवार दि.८ एप्रिलपासून गॅस एजन्सीमार्फत घरगुती सिलिंडर थेट प्रत्येक गावोगावी ग्राहकांपर्यंत पोहोचवला जाणार आहे.

सुधागड तालुक्यातील दुर्गम आणि ग्रामीण भागातून महिला, वयोवृद्ध नागरिकांना स्वखर्चाने खासगी गाड्या करून पाली येथे सिलिंडर आणण्यासाठी यावे लागत होते. त्यासाठी दीड ते २ हजार रुपये गाडी भाडे मोजावे लागत असे, शिवाय रणरणत्या उन्हात तासनतास रांगेत उभे राहावे लागत होते. या त्रासाची दखल घेत मनसे पदाधिकाऱ्यांनी मंगळवारी (दि.७) भारत गॅस एजन्सी आणि तहसीलदार उत्तम कुंभार यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा केली. चर्चेदरम्यान मनसेतर्फे गॅस एजन्सीला स्पष्ट शब्दांत सांगण्यात आले की, नागरिकांनी सिलिंडरसाठी पालीला येण्याची गरज पडता कामा नये. एजन्सीने आपली यंत्रणा राबवून गावोगावी पोहोच सेवा सुरू करावी. ज्या ग्राहकांचे बुकिंग आहे त्यांना प्राधान्याने सिलिंडर द्यावा आणि ज्यांना तांत्रिक अडचणींमुळे बुकिंग करता येत नाही, त्यांना स्थानिक स्तरावर मदत करावी. या यशस्वी पाठपुराव्यासाठी मनसे सुधागड तालुका उपाध्यक्ष केवल चव्हाण, चव्हाणवाडी शाखा अध्यक्ष परेश वनगले, मुकेश चव्हाण, योगेश चव्हाण, हिरामण पाटेकर, निलेश गोरीवले आणि नरेंद्र घोगले यांसह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



## चाकूचा धाक दाखवून लुटले

**नवीन पनवेल :** चाकूचा धाक दाखवून एका वृद्ध महिलेकडील चार ग्राम वजनाची सोन्याची चैन हिसकावून नेल्याप्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जानकी टीसी या नवीन पनवेल सेक्टर ११ येथे राहत असून त्या शतपावली करून सोसायटीच्या पहिल्या माळ्यावर आल्या. त्यावेळी सोसायटीच्या जिन्यावरून खाली एक ३० वर्षीय अनोळखी व्यक्ती आला. त्याने तोंडाला मास्क आणि चष्मा घातला होता. त्या ठिकाणी असलेल्या वृद्ध महिलेला त्याने चाकूचा धाक दाखवला आणि त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावली.

## आदिवासी समाजाला प्रगतीवर आणण्याचे उद्दिष्ट | पोलीस अधिक्षक आंचल दलाल यांचा प्रयत्न

# आदिवासी विद्यार्थ्यांवर पोलिसांचा 'भरोसा'

| नेरळ | प्रतिनिधी |

रायगड जिल्ह्याचा जीडीपी राज्यात अव्वल आहे; मात्र, आपला आदिवासी समाज खुप मागे आहे. त्यामुळे जिल्ह्यातील आदिवासी समाजाला प्रगतीवर आणण्याचे उद्दिष्ट ठेवून भरोसा सेल सुरू केले आहे, असे जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी जाहीर केले. कर्जत तालुक्यातील आदिवासी विद्यार्थ्यांसाठी प्रेरणा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी त्या बोलत होत्या.

माणगाव वाडी येथील अनुदानित आदिवासी आश्रमशाळेत जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या संकल्पनेतून आदिवासी विद्यार्थ्यांसाठी शिक्षण व करियर मार्गदर्शन तसेच बालविवाह अंधश्रद्धा निर्मूलन बद्दल जनजागृती कार्यक्रम राबविण्यात आला. या कार्यक्रमासाठी माणगाव वाडी शासकीय आश्रमशाळा, चाफेवाडी शासकीय आदिवासी आश्रमशाळा आणि पाथरज शासकीय आश्रमशाळा मधील विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी आदिवासी विकास विभागाच्या प्रकल्प अधिकारी यशस्विनी गलांडे, पोलीस उप अधीक्षक राहुल गायकवाड, जिल्हा भरोसा सेल समन्वयक स्मिता पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक राहुल वरोटे, माथेरानच्या प्रभारी पोलीस अधिकारी सरिता मुसळे आदींसह आदिवासी आश्रमशाळा संचालक माधव गायकवाड आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आंचल दलाल या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाल्या की, राज्यात रायगड जिल्हा आर्थिक स्तरावर अव्वल आहे. मात्र, आदिवासी समाज प्रगतीवर पोहचला नाही. त्यासाठी माझ्या माध्यमातून हा वेगळा उपक्रम राबवित आहोत. आदिवासी भागात प्रामुख्याने कमी वय असताना लग्न होते. तसेच, लग्नाआधी गरोदर राहण्याचे प्रमाण देखील आहे. पालकांमध्ये व्यसनाचे प्रमाण देखील अधिक आहे. त्यात सर्व सुधारणा व्हावी, आदिवासी मुले कुठेही कमी पडू नयेत, त्यासाठी हा उपक्रम राबविला जात आहे, असे त्यांनी सांगितले.



"भरोसा सेलकडून आयोजित करण्यात आलेल्या प्रेरणा उपक्रमात आता मेडिकल कॅम्प देखील असणार आहे. दर आठवड्याला आश्रमशाळेमधील विद्यार्थ्यांसाठी मोफत आरोग्य शिबीर ही योजना राबविली जाईल. तसेच, प्रेरणा कार्यक्रम ज्या ज्या ठिकाणी राबविला जात आहे त्या त्या ठिकाणच्या आदिवासी वाडीत जाऊन महिलांचे समुपदेशन करण्यास सुरुवात केली आहे.वाडीमधील अनेक प्रश्न समजून घेत तेथील जनतेतील मद्यपान बंद करण्यावर आमचा भर आहे.
- आंचल दलाल, पोलीस अधीक्षक, रायगड जिल्हा"

# पलटूरामाला अक्कल आली

डोनाल्ड ट्रम्प यांना अमेरिकेत पलटूराम असे म्हणतात. प्रत्येक वेळी अखेरच्या क्षणी ते पलटी मारतात (ट्रम्प ऑलवेज चिकन्स आऊट असे इंग्रजीत म्हणतात) असा त्यांचा लौकिक आहे. टॅरिफ धोरणाच्या वेळी आधी त्यांनी ५० पासून ५०० टक्क्यांपर्यंत आयातशुल्क लागू करण्याच्या घोषणा केल्या. जगभर वातावरण तापवले. नंतर एकेक करून हरेक देशाशी तडजोड केली आणि शुल्क कमी केले. इराणच्या युध्दातही अखेर त्याचा प्रत्यय आला आणि युद्धबंदी झाली. अर्थात पलटूरामाच्या या पलटीचे स्वागतच करायला हवे. गेले काही दिवस डोनाल्ड ट्रम्प यांच्या धमक्या वाढल्या होत्या. प्रचंड हल्ले करू आणि इराणची संस्कृती कायमची नष्ट करून टाकू असा इशारा त्यांनी मंगळवारी दिला होता. इराणही त्यांना जन्माची अद्दल घडवण्याचे प्रत्युत्तर देत होता. त्यामुळे अमेरिका अण्वस्त्रांचा वापर करणार की काय अशी चिंता व्यक्त होत होती. अमेरिकेने तसे करणार नाही असा खुलासा केला असला तरी काहीतरी प्रचंड विध्वंसकारी घडेल अशी भीती सर्वांना वाटत होती. पण अखेर त्यांना अक्कल आली. मुदत संपायला एक तास असतानाच अमेरिकेने युद्धबंदी लागू केली. त्या बदल्यात इराणने दोन आठवडे होर्मूझच्या सामुद्रधुनीतून वाहतुकीला परवानगी देण्याचे मान्य केले. आता दोन्ही बाजू आपलाच विजय झाला असे म्हणत आहेत. हे युध्द सहा आठवडे चालेल असे ट्रम्प म्हणाले होते, पण आम्ही ३८ दिवसातच विजय मिळवून दिला असे व्हाईट हाऊसच्या प्रवक्त्याने म्हटले आहे. दुसरीकडे इराणने सावध प्रतिक्रिया दिली आहे. दोन आठवड्यांसाठी आमचे लष्करी हल्ले बंद राहतील असे मोजतबा खामेनी या सर्वोच्च नेत्यांनी जाहीर केले आहे. इराणच्या रस्त्यांवर त्याचे स्वागत झाले आहे. तेही साहजिक आहे. कारण गेले महिनाभर सतत इस्रायल व अमेरिकेच्या हल्ल्याने इराणच्या सरकारी इमारती, पूल, शाळा, कॉलेजे, रस्ते जर्जर झाले आहेत. तेहरानमधील निम्मे लोक शहर सोडून बाहेर पळाले आहेत. त्यांना आता श्वास घेता येईल. जगातील सर्वच देश या युद्धामुळे बेजार झाले होते. त्यामुळे ते सर्वच याचे स्वागत करतील.

### ट्रम्पला हवे होते निमित्त

ट्रम्पला या युद्धातून बाहेर पडायचेच होते. खुद्द अमेरिकेत त्यांच्या विरोधात तीव्र टीका होत होती. तेलाचे व इतर वस्तूंचे भाव वाढत होते. शेअर बाजारात हलकल्लोळ चालू होता. हे युद्ध कशासाठी चालू केले हे ट्रम्प अखेरपर्यंत सांगू शकत नव्हते. इराणकडे अण्वस्त्रे आहेत हा प्रचार खोटा होता. कारण इराणच्या अणुप्रकल्पाची जागतिक संस्था नियमित पाहणी करीत होत्या. इराणचा अमेरिका किंवा युरोपला कोणताही धोका नव्हता. इराणमध्ये नेतृत्वाविरुद्ध असंतोष ही तिथली अंतर्गत बाब होती. त्यात अमेरिकेने पडायचे कारणच नव्हते. पण टॅरिफ धोरण न्यायालयाने बेकायदा ठरवल्याने ट्रम्प यांना लोकांचे लक्ष वळवण्यासाठी एक निमित्त हवे होते. ते या युध्दाने पुरवले. ट्रम्प यांना असे वाटत होते की चार दिवस युद्ध करू, अमेरिका जिंकली असे जाहीर करू आणि बाहेर पडू. पण ते त्यांना जमले नाही. त्यामुळे आता नामुष्कीच्या स्थितीत माघार घेऊन त्यालाच विजय म्हणण्याची आणि पाकिस्तानची मध्यस्थी स्वीकारण्याची पाळी त्यांच्यावर आली. तूर्तास हा युध्दविराम १५ दिवसांचा आहे. तरी पुन्हा युध्द सुरू होणार नाही असे सांगता येत नाही. अमेरिकेच्या धोरणाप्रमाणेच, इस्रायलने इराणवर हल्ले थांबवण्याचे मान्य केले असले तरी लेबनॉनवर हल्ले चालूच राहतील असे म्हटले आहे. म्हणजे आखातातील अशांतता कायम राहणार. इस्रायलला वेसण घालण्यास अमेरिका वारंवार असमर्थ ठरली आहे. किंबहुना आता तर ट्रम्प इस्रायलच्या ओंजळीने पाणी पिताहेत असेच चित्र आहे. दुसरीकडे होर्मूझच्या आखातातून वाहतूक सुरू करण्यास इराणने सध्या परवानगी दिली असली तरी आमचा एक हात बंदुकीच्या ट्रिगरवर कायम राहील अशी स्पष्ट धमकी इराणने दिली आहे. त्यामुळे इस्रायलच्या हल्ल्यांचे कारण देऊन इराण पुन्हा होर्मूझ बंद करणार नाही याची काहीही हमी नाही. होर्मूझ हा इराणच्या हातातला हुकुमी एक्का आहे. या आखातातून जगातल्या तेलाची वीस टक्के वाहतूक होते. भारतात येणारे बहुतांश तेल व गॅस इथूनच येतो. चीनचेही तेच आहे. त्यामुळे या पूर्वेकडच्या जगाचे नाक दाबल्याखेरीज ट्रम्प आणि इस्रायलचे तोंड उघडत नाही हा इराणचा अनुभव आहे. त्याचाच ते पुन्हा पुन्हा वापर करीत राहू शकतात.

### पाकिस्तान नवा विश्वगुरु?

शस्त्रसंधी करताना ट्रम्प यांनी पाकिस्तानच्या मध्यस्थीचा आवर्जून उल्लेख केला. पंतप्रधान शाहबाज शरीफ आणि लष्करप्रमुख मुनीर यांच्याशी बोलणे झाल्याप्रमाणे आपण शस्त्रसंधीचा निर्णय घेत आहोत असे त्यांनी म्हटले आहे. ही म्हटली तर गमतीशीर आणि म्हटले तर गंभीर अशी बाब आहे. पाकिस्तान हा दिवाळ्यात निघालेला देश आहे. अमेरिका आणि सौदी वगैरेंच्या भिकेवर तो जगतो आहे. अफगाणिस्तानातील तालिबान्यांचे हल्लेही त्याला झेपत नाहीयेत. पण त्याच्या नेत्यांनी ट्रम्पवर जादू केली आहे. त्यामुळेच ट्रम्पने मुनीर यांना खास आपल्या घरी जेवायला बोलावले होते. आता येत्या दहा तारखेला पाकिस्तानात इराण व अमेरिका यांच्या प्रतिनिधींची थेट चर्चा आयोजित करण्यात आली आहे. अशा वाटाघाटींचे गुऱ्हाळ पुढे चालू राहील. अर्थात इराणला पाकिस्तानची ही मध्यस्थी फारशी मान्य नाही. इराण तेलसंपन्न असल्याने तो पाकिस्तानला जमेस धरू इच्छित नाही. शिवाय, इराणने आजवर युरोपच्या मध्यस्थीने कायमच अमेरिकेशी थेट चर्चा केलेली आहे. यावेळी इंग्लंड, फ्रान्स इत्यादींनी ट्रम्पवर ऐन युध्दात टीका केल्याने व युध्दात भाग न घेतल्याने त्यांना कटाप करण्यात आलेले दिसते. दरम्यान, ट्रम्प यांनी या शस्त्रसंधीमध्ये चीनची भूमिका मोठी राहिल्याचे संकेत दिले आहेत. ते त्यांना सोईचे आहे. चीनलाही पाकिस्तानला पुढे करून चर्चा होत असेल तर ना नसेल. पण जागतिक राजकारणात पाकिस्तानला अवचितपणे मिळालेले हे महत्व भारतासाठी नक्कीच काही प्रश्न निर्माण करणारे ठरेल. इतके दिवस नरेंद्र मोदींना विश्वगुरु असल्याचे भास होत होते. पण या युध्दात त्यांची भूमिका शून्य आहे. उलट इस्रायल व अमेरिकेचा ठाम निषेध न केल्याने भारताला त्यांनी या देशांच्या दावणीला बांधले असा संदेश मात्र सर्वत्र गेला. भारत तटस्थ असता तरच त्याच्या भूमिकेला महत्व होते. पण मोदींच्या राजकारणापायी आपण हे महत्व घालवले आहे. या युध्दाने सर्व जगाच्या अर्थव्यवस्थांचे बारा वाजवले आहेत. पुढचे कित्येक महिने याचे परिणाम सर्वांना भोगावे लागणार आहेत. भारतातही महागाई व बेकारी वाढल्याचा अनुभव येणार आहे. विशेषतः गॅसचा पुरवठा सुधारणे कठीण आहे. शिवाय पुन्हा कधीही भडका उडण्याची टांगती तलवार कायम राहणार आहे.

## विचार

# भविष्यासाठी धोक्याची घंटा

***व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानच्या युद्धातून बोध न घेता अमेरिकेने इराणवर केलेला हल्ला ही एक मोठी धोरणात्मक चूक ठरली. सत्तापरिवर्तनाचा उद्देश बाळगून पुकारलेल्या या संघर्षात अमेरिकेला प्रचंड आर्थिक हानी आणि मानवी जीवनाची मोठी किंमत मोजावी लागत आहे. यामुळे जागतिक राजकारणातील अमेरिकेचे वर्चस्व पुन्हा एकदा धोक्यात येऊ शकते. जगातील या महासत्तेसाठी हा धोक्याचा इशारा आहे.***

**निवृत्त विजय जोशी**

अमेरिकेचे व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानमधील हस्तक्षेप हे जागतिक राजकारणातील अत्यंत महत्त्वाचे आणि तितकेच वादग्रस्त विषय आहेत. या युद्धांनी अमेरिकेचे लष्करी सामर्थ्यच नाही, तर त्यांच्या परराष्ट्र धोरणातील मर्यादाही जगासमोर आणल्या. अमेरिकेच्या इतिहासातील ती दोन सर्वात प्रदीर्घ युद्धे आहेत. शीतयुद्धकालीन साम्यवाद रोखणे आणि २१ व्या शतकातील दहशतवाद संपवणे या उद्दिष्टांनी अमेरिका या संघर्षात उतरली. मात्र, भौगोलिक आव्हाने, स्थानिक गनिमी कावा आणि राजकीय अस्थिरतेमुळे अमेरिकेला या दोन्ही युद्धांमधून अपेक्षित यश न मिळताच माघार घ्यावी लागली. दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका जगातील महासत्ता म्हणून उदयाला आली. स्वतःची लोकशाही मूल्ये आणि हितसंबंध जपण्यासाठी अमेरिकेने जगभरातील विविध संघर्षांमध्ये हस्तक्षेप करण्याचे धोरण अवलंबले. एक देश साम्यवादी झाला तर शेजारील देशही साम्यवादी होतील, या भीतीपोटी १९५५ मध्ये व्हिएतनाममध्ये साम्यवादाचा प्रसार रोखण्यासाठी अमेरिका युद्धात उतरली. दक्षिण व्हिएतनाममध्ये लोकशाही सरकार टिकवणे हा त्यावेळी युद्धाचा उद्देश असल्याचे अमेरिकेने जगाला भासवले. २००१ मध्ये ९/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा बदला घेण्यासाठी आणि 'अल-कायदा'चा नायनाट करण्याचे निमित्त साधून अमेरिकेने अफगाणिस्तानवर आक्रमण केलेले आपण पाहिले. मूळ उद्देश तालिबान राजवट संपवून लोकशाही प्रस्थापित करणे हा होता. ही दोन्ही युद्धे सुरुवातीला लष्करीदृष्ट्या यशस्वी वाटली तरी, काळानुरूप ती अमेरिकेसाठी आर्थिक आणि मानवी दृष्टीने प्रचंड महागडी ठरली. असा हा अमेरिकेच्या अपयशाचा पाढा जगभर वाचला जातो.

स्थानिक जनतेचा विरोध आणि राष्ट्र उभारणीमधील अपयश यामुळे अमेरिकेला या युद्धांमध्ये ऐतिहासिक पराभवाचा सामना करावा लागला. व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानच्या अनुभवानंतर अमेरिकेने काही धोरणात्मक बदल केले असले, तरी काही चुकांची पुनरावृत्ती होताना दिसत आहे. त्यामुळे मागील युद्धांमधून अमेरिकेने काहीच शिकवण घेतली नाही का, असा प्रश्न संरक्षणविषयक अभ्यासकांना पडणे क्रमप्राप्त आहे. व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानप्रमाणे लाखो सैनिक जमिनीवर उतरवण्याऐवजी अमेरिका हवाई हल्ले, नौदल आणि विशेष दलांचा अधिक वापर करत आहे. याला लाईट फूटप्रिंट धोरण म्हणजे प्रत्यक्ष जमिनीवरील युद्ध टाळून स्वतःच्या सैनिकांची जीवितहानी टाळणे म्हणतात. लष्करी ताकदीने शत्रूला हरवणे सोपे असते, पण तिथे स्थिर लोकशाही किंवा भ्रष्टाचारमुक्त सरकार स्थापन करणे अवघड असते, जे अमेरिकेला आजवर जमलेले नाही. इराकमधील सध्याची राजकीय अस्थिरता हे याचेच उदाहरण आहे. अमेरिकेचा इराणवरील हल्ला आणि एकूणच मध्यपूर्वेतील सध्याचा हस्तक्षेप पाहता आणि सध्याच्या जागतिक स्थितीचा विचार करता अमेरिकेसाठी ही परिस्थिती खरोखरच गुंतागुंतीची आणि खर्चिक बनून पुन्हा एकदा गंभीर वळणावर आहे. अमेरिकेने नुकत्याच सुरू केलेल्या ऑपरेशन 'एपिक फ्युरी'मुळे लष्करी खर्च गगनाला भिडला आहे. काही अंदाजानुसार, या मोहिमेसाठी अमेरिका दररोज दीड ते दोन अब्ज डॉलर्स खर्च करत आहे. युद्धाच्या सुरुवातीच्या १२ दिवसांमध्येच सुमारे १६.५ अब्ज डॉलर्स खर्च झाले आहेत.

इराणसोबतच्या तणावामुळे आणि होर्मुझची सामुद्रधुनी बंद झाल्यामुळे जागतिक तेलाचे भाव ११०-११५ डॉलर्स प्रति बॅरल पर्यंत पोहोचले आहेत. याचा थेट फटका अमेरिकन अर्थव्यवस्थेला बसत असून तिथे महागाई वाढली आहे. इराक, जॉर्डन, यूएईमधील अमेरिकन दूतावास आणि तळांवर वारंवार ड्रोन आणि मिसाईल हल्ले होत आहेत. अमेरिकेने आपल्या गैर-अत्यावश्यक कर्मचाऱ्यांना इराक सोडण्याचे आदेश दिले आहेत. यामुळे परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाण्याची भीती आहे. परकीय सैन्याच्या उपस्थितीमुळे स्थानिक जनतेमध्ये निर्माण होणारा असंतोष आणि त्यातून उभे राहणारे सशस्त्र गट यांचा अंदाज घेण्यात अमेरिका अफगाणिस्तानप्रमाणेच पुन्हा एकदा कमी पडत असल्याचे दिसते. युद्ध सुरू करणे सोपे असते, पण ते कधी आणि कसे संपवायचे याची स्पष्ट योजना ट्रम्प यांच्याकडे नसल्याचे टीकाकार मानतात. थोडक्यात सांगायचे तर, अमेरिकेने तंत्रज्ञान आणि लष्करी डावपेचांमध्ये सुधारणा केली असली, तरी युद्धाचे मानवी आणि राजकीय परिणाम हाताळण्यात त्यांना अजूनही जुन्याच आव्हानांचा सामना करावा लागत आहे. लष्करी ताकद हे प्रत्येक समस्येवरचे उत्तर असू शकत नाही, ही व्हिएतनाममधील शिकवण आज २०२६ मध्येही अमेरिकेला तितकीच लागू पडते. व्हिएतनाम आणि अफगाणिस्तान या दोन्ही युद्धांचा इतिहास पाहिला, तर अमेरिकेने केलेल्या चुकांची एक ठराविक पद्धत दिसून येते. इराणच्या संदर्भातही अमेरिका त्याच मार्गावर असल्याचे दिसते.

व्हिएतनाममध्ये कम्युनिझमचा विरोध करताना अमेरिकेने तिथल्या राष्ट्रवादाकडे दुर्लक्ष केले. अफगाणिस्तानमध्येही स्थानिक टोळीयुद्ध आणि संस्कृतीचा अंदाज त्यांना आला नाही. इराणमध्येही सत्तापालट करताना तिथल्या जनतेची धार्मिक आणि सांस्कृतिक अस्मिता अमेरिकेला भारी पडू शकते. त्यातच धार्मिक नेते आयातुल्ला खामेनाई यांच्या मृत्यूमुळे इराणी जनतेला मोठा धक्का बसला असून अमेरिकेबद्दल त्यांच्या मनात रोष आहे. युद्ध का लढले जात आहे आणि विजय म्हणजे नक्की काय, याची स्पष्ट व्याख्या या तिन्ही ठिकाणी अभावित दिसते. केवळ लष्करी ताकद वापरून लोकशाही लादता येत नाही, हा धडा अमेरिका विसरत आहे. व्हिएतनामला चीन आणि रशियाची मदत होती. अफगाणिस्तानमध्ये तालिबानला शेजारील देशांचे पाठबळ होते. इराणकडे स्वतःचे हिजबुल्ला आणि हमास यांचे मजबूत नेटवर्क आहे. त्यामुळे हे युद्ध केवळ एका देशापुरते मर्यादित न राहता संपूर्ण पश्चिम आशिया पेटले आहे. युद्धात उतरणे सोपे असते, पण बाहेर पडणे कठीण. अफगाणिस्तानमधून २० वर्षांनंतर ज्या घाईने अमेरिकेला बाहेर पडावे लागले, तशीच परिस्थिती इराणमध्ये उद्भवू शकते. इराणची भौगोलिक रचना आणि प्रगत क्षेपणास्त्र प्रणाली पाहता या देशाला हलक्यात घेणाऱ्या अमेरिकेसाठी हे युद्ध व्हिएतनामपेक्षाही भीषण आणि प्रदीर्घ ठरू लागले आहे. व्हिएतनाम, अफगाणिस्तान आणि इराणच्या भौगोलिक आणि लष्करी परिस्थितीची तुलना केली, तर इराणसोबतचे जमिनीवरील युद्ध अमेरिकेसाठी आतापर्यंतचे सर्वात घातक आणि खर्चिक युद्ध ठरू शकते, हे आता दिसत आहे.

व्हिएतनाम युद्धात अमेरिकेला सर्वात मोठा फटका तिथल्या घनदाट जंगलांमुळे आणि उत्तर व्हिएतनामी सैन्याच्या गनिमी काव्यामुळे बसला. अमेरिकेने अत्याधुनिक विमाने आणि बॉम्बचा वापर केला, पण जमिनीवर उतरलेले त्यांचे सैनिक प्रादेशिक रचनेची सखोल माहिती असलेल्या शत्रूला रोखू शकले नाहीत. साध्या बोगद्यांच्या जाळ्याचा वापर करून व्हिएतनामी सैन्याने अमेरिकन सैन्याला अशा ठिकाणी खेचले, जिथे तंत्रज्ञान निकामी ठरले. या युद्धात ५८,००० हून अधिक अमेरिकन सैनिक मारले गेले. त्यामुळे अमेरिकन समाजात मोठा असंतोष निर्माण झाला. अफगाणिस्तानला साम्राज्यांची स्मशानभूमी म्हटले जाते आणि अमेरिकेलाही तब्बल वीस वर्षांनंतर तिथून रिकाम्या हाती परतावे लागले. अफगाणिस्तानचा डोंगराळ भाग आणि दुर्गम खिंडी यामुळे अमेरिकन पायदळाला हालचाली करणे कठीण झाले. तालिबानने कधीही समोरासमोर युद्ध न खेळता आयईडी स्फोट आणि अचानक हल्ले करून अमेरिकन सैन्याला थकवून सोडले. आधुनिक शस्त्रास्त्रे असूनही, स्थानिक पाठबळ असलेल्या कट्टर सैनिकांसमोर अमेरिकेची हाय-टेक यंत्रणा अपयशी ठरली आणि त्यांना शेवटी माघार घ्यावी लागली. इराणची परिस्थिती व्हिएतनाम आणि अफगाणिस्तानपेक्षा किती तरी पटींनी वेगळी आणि कठीण आहे. इराणकडे सुसज्ज आणि प्रशिक्षित नियमित सैन्य आहे, स्वतःची प्रगत क्षेपणास्त्रे, ड्रोन आणि नौदल आहे. इराणचा भूगोल हा नैसर्गिक किल्ल्यासारखा आहे, त्यांच्या सीमांवर उंच डोंगररांगा आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर लष्करी टँक किंवा पायदळ घुसवणे अमेरिकेसाठी आत्मघातकी ठरू शकते. अमेरिकेने जमिनीवरून हल्ल्याचा प्रयत्न केल्यास, इराणचे बॅलिस्टिक मिसाईल्स मोठा विद्ध्वंस करू शकतात.

अमेरिकन सैन्य इराणमध्ये जमिनीवरून घुसले, तर त्यांना एका देशाच्या राष्ट्रवादाशीही लढावे लागेल. इराणची प्रॉक्सी युद्धाची क्षमता (उदा. हिजबुल्ला) अमेरिकेच्या पुरवठा साखळीवर आणि इस्रायल, सौदी अरेबियासारख्या मित्रराष्ट्रांवर भीषण हल्ले करत आहे. अशा युद्धात पहिल्या काही महिन्यांमध्येच अमेरिकेला हजारो सैनिकांच्या बलिदानाची तयारी ठेवावी लागेल. व्हिएतनाममध्ये झालेली जीवित हानी ही केवळ सुरुवात वाटू शकेल, इतका भीषण प्रतिकार इराणकडून होण्याची शक्यता आहे. इराणकडे अण्वस्त्रे असल्याचे कोणतेही पुरावे अमेरिकेने दिलेले नाहीत. तरीही अमेरिकेने या राष्ट्रावर हल्ला केला हे जगासमोर आल्यास प्रचंड टीका होईल. विनाशकारी शस्त्रास्त्रांचा खोटा दावा पुन्हा एकदा जगासमोर येईल. यामुळे अमेरिकेची विश्वासार्हता पूर्णपणे रसातळाला जाईल. या युद्धामुळे आर्थिक मंदी आणि इंधनटंचाईचा सामना करणाऱ्या देशांची प्रतिक्रिया अत्यंत तीव्र असेल. कच्च्या तेलाचे दर कडाडल्यामुळे या देशांच्या अर्थव्यवस्था कोलमडतील. त्यामुळे हे देश अमेरिकेच्या या निर्णयाचा केवळ निषेधच करणार नाहीत, तर जागतिक मंचावर अमेरिकेला एकतर्फी आणि बेजबाबदार राष्ट्र म्हणून घोषित करून निर्बंध लादण्याची किंवा राजनैतिक संबंध तोडण्याची मागणीही करू शकतात.

(शब्दांकन: शंतनु चिंचाळकर)

# प्रभावी उपचार म्हणजेच होमिओपॅथी

**डॉ. आशिष भगत**

भारतात होमिओपॅथीचा सराव दीड शतकाहून अधिक काळापासून केला जात आहे. तरीही, सामान्य माणसाचा अनेकदा तिच्या वापर, उपयोग आणि परिणामकारकतेबद्दलच्या विविध गैरसमजांमुळे दिशाभूल होतो. होमिओपॅथी ही एक नैसर्गिक उपचार पद्धती आहे, जिचा उद्देश अशा औषधाद्वारे रुग्णाचे दुःख बरे करणे आहे. ही उपचार पद्धती फार पूर्वीपासून रुग्णांच्या उपचारात्मक, प्रतिबंधात्मक आणि आरोग्यवर्धक सेवेसाठी योगदान देत आहे.

**होमिओपॅथी हे एक प्रमाणित शास्त्र आहे का?**

होमिओपॅथी हे एक सिद्ध शास्त्र आहे. ते प्रायोगिक, औषधशास्त्रीय आणि वैद्यकीय माहितीवर आधारित आहे. होमिओपॅथिक औषधांच्या विविध आजारांवरील परिणामकारकतेचा अनेक वर्षांपासून सखोल अभ्यास केला गेला आहे. भारतात तसेच इतर देशांमध्ये वनस्पती, प्राणी आणि मानवांवर क्लिनिकल अभ्यास केले गेले आहेत. पद्धतशीर वैज्ञानिक संशोधन आणि अभ्यासाने विविध प्रकारच्या आजारांमध्ये होमिओपॅथी औषधांची परिणामकारकता सिद्ध केली आहे.

**होमिओपॅथी काय व कसे काम करते?**

होमिओपॅथी हे शास्त्र शुद्ध वैज्ञनिकदृष्ट्या प्रमणीत वैद्यकीय शाखा असून तिचा उगम जर्मनी मध्ये १८ व्या शतकात झाला आहे. होमिओपॅथी औषधी या निसर्गातील वनस्पती, खनिज, धातू, प्राण्यांच्या पदार्था पासून बनवली जातात, अर्थातच म्हणून ती काही शरीराला अपाय कारक नसतात. कारण ती औषधी तत्त्वावर बनवली जातात. होमिओपॅथिक औषधे ही काट्याने काटा काढणे या मूळ तत्वावर काम करतात, यालाच जर्मनी मध्ये similia similibus curenture (like cures like) म्हणतात. म्हणजेच ज्या औषधामध्ये आजारपणाची लक्षणे निर्माण करण्याची ताकद असते, तेच औषध मनुष्याच्या शरीरातील आजार काढून टाकण्यात यशस्वीपणे प्रभावी अंमलबजावणी करते. जसे कांदा कापल्यावर आपल्या डोळ्यातून पाणी येते, सर्दी होते व त्याच कांद्याचा वापर करून ही औषधी सर्दी खोकला समुळ काढून टाकण्यात यशस्वी होते. होमिओपॅथी औषधी मनुष्य शरीराची रोगप्रतिकारक क्षमता वाढविण्यासाठी मदत करते, त्यामुळे वारंवार रोगाला बळी पडलेल्या व्यक्तीला कायमची रोगातून सुटका होण्यास मदत होते.

**होमिओपॅथी हळू काम करते का आणि तीव्र आजारांमध्ये तिचा वापर करता येत का?**

होमिओपॅथिक औषधांच्या क्रियेचा वेग आजार उद्भवण्याच्या वेळेवर अवलंबून असतो. जर आजार नुकताच सुरू झाला असेल, आणि निवडलेले औषध योग्य असेल, तर होमिओपॅथी जलद काम करते. जुनाट संधिवात, दमा, सोरायसिस इत्यादींसारख्या दीर्घकाळ चालणाऱ्या आजारांमध्ये, पूर्ण बरे होण्यासाठी नैसर्गिकरित्या जास्त वेळ लागतो. बहुतेक लोक जुनाट आजारांमध्ये होमिओपॅथीचा आधार घेतात, ज्यावर कोणत्याही वैद्यकीय प्रणालीमध्ये उपचार करण्यासाठी जास्त कालावधी लागतो. होमिओपॅथी हे 'जादुई औषध' आहे का, जे काहीही आणि सर्वकाही बरे करू शकते? इतर कोणत्याही वैद्यकीय प्रणालीप्रमाणे, होमिओपॅथीची स्वतःची व्याप्ती आणि मर्यादा आहेत. उदाहरणार्थ, होमिओपॅथी जुनाट, , स्थानिक किंवा सामान्य अशा सर्व प्रकारच्या आजारांवर उपचार करू शकते. जिथे शस्त्रक्रिया पूर्णपणे आवश्यक आणि / किंवा अपरिहार्य आहे. तथापि, वाढलेले टॉन्सिल्स, नाकातील पॉलिप्स, किडनी स्टोन, मूळव्याध, चामखीळ इत्यादींसारख्या काही शस्त्रक्रियाजन्य समस्यांवर योग्य होमिओपॅथी औषधोपचाराने उपचार करता येतात.

**होमिओपॅथी डॉक्टर हे वैद्यकीय क्षेत्रात आहेत का?**

भारताच्या बहुतेक भागांमध्ये पात्र पदवीधारक वैद्य होमिओपॅथीचा सराव करतात. भारतात होमिओपॅथीच्या क्षेत्रात पदवी अभ्यासक्रम प्रदान करण्यासाठी समर्पित २७० हून अधिक वैद्यकीय महाविद्यालये आणि पदव्युत्तर शिक्षण देणारी ३३ महाविद्यालये आहेत. सध्या, देशात ३,००,००० हून अधिक प्रशिक्षित होमिओपॅथ आहेत.

**होमिओपॅथिक उपचारादरम्यान चहा, कांदा, लसूण इत्यादी निषिध्द आहेत हे खरे आहे का?**

कांदा, लसूण, चहा, कॉफी, अत्तर इत्यादींमुळे होमिओपॅथी औषधांचा प्रभाव कमी होत नाही. तथापि, असे काही पदार्थ आहेत जे काही होमिओपॅथिक औषधांच्या परिणामात अडथळा आणतात आणि त्यांना निष्प्रभ करतात, त्यामुळे सर्वोत्तम परिणामांसाठी ही औषधे वापरताना असे पदार्थ टाळणेच श्रेयस्कर आहे. तसेच, धूम्रपान, मद्यपान किंवा तंबाखू चघळणे यांसारख्या सवयींचे व्यसन नसलेल्या व्यक्तींमध्ये होमिओपॅथिक औषधे अधिक प्रभावीपणे कार्य करतात.

**होमिओपॅथी केवळ जुनाट आजारांमध्येच उपयुक्त आहे का?**

होमिओपॅथी अनेकदा तेव्हा प्रभावी ठरते जेव्हा सर्व उपाय अयशस्वी ठरतात. परंतु याचे कारण असेही आहे की, अनेक वर्षे दुसऱ्या पॅथीचे उपचार घेऊनही यश न मिळाल्यानंतर रुग्ण होमिओपॅथीकडे वळतात. तोपर्यंत, आजार जुनाट (क्रॉनिक) झालेला असतो आणि साहजिकच (त्याच्या जुनाटपणामुळे) उपचारांचा कालावधी तीव्र (ॲक्यूट) असताना लागणाऱ्या कालावधीच्या तुलनेत जास्त लागतो.

**होमिओपॅथिक औषधांचे फायदे काय आहेत ?**

होमिओपॅथिक औषधे अतिशय जलदरित्या व प्रभावीपणे रोग निवारण करतात. त्यांना दुष्परिणाम (Side Effects ) नाहीत. होमिओपॅथिक औषधे मानसिक दृष्टिकोनातुन बदल घडवून आणतात, त्यामुळे तुमच्या स्वभावात चांगले बदल होतात. चिंता, काळजी, दुःख, राग, मत्सर, भिती इ. गोष्टी कमी होऊन तुमचे आजार बरे होतात. कुठेही सहज जवळ बाळगता येण्याजोगी होमिओपॅथिक औषधे मधुर, घेण्यास अतिशय सोपी व इतर औषधांसोबत घेतली जाऊ शकतात. सर्व प्रकारच्या आजारांवर प्रभावी उपचार पद्धती म्हणजे होमिओपॅथी आहे.

## लोकसंसद

### यंदा मान्सूनचा पाऊस सामान्यपेक्षा कमी!



खाजगी हवामान अंदाज संस्था 'स्कायमेट वेदर' या संस्थेने या वर्षी भारतातील मान्सूनचा पाऊस सामान्यपेक्षा कमी राहण्याची शक्यता वर्तविली आहे. यंदाचा पाऊस दीर्घकालीन सरासरीच्या (लाँग पिरियड ॲव्हरेज) सुमारे ९४ टक्के राहील असा अंदाज आहे. तसेच जून ते सप्टेंबर या मान्सून हंगामात 'एल निनो'चे संभाव्य पुनरागमन हा ही एक प्रमुख अडथळा असल्याचेही स्कायमेटने अधोरेखित केले आहे. 'एल निनो' म्हणजे प्रशांत महासागरात समुद्राच्या पृष्ठभागावरील तापमान सामान्यापेक्षा वाढते, त्यामुळे पाऊस कमी होतो. कमी पावसामुळे दुष्काळाचा धोका निर्माण झाला असून याचा कृषी आणि अर्थव्यवस्थेवर परिणाम होण्याची शक्यता आहे. आपला देश कृषीप्रधान देश असल्यामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेत महत्त्वाचा वाटा असलेल्या कृषी क्षेत्रासाठी मान्सूनचा पाऊस अत्यंत महत्त्वाचा आहे. खरीप हंगामातील पिकांसाठी जून आणि जुलै महिन्यात चांगला पाऊस पडणे अपेक्षित असते. मात्र कमी पावसामुळे खरीपाची पिके धोक्यात येऊ शकतात. ग्रामीण भागात पाणीटंचाई निर्माण होऊ शकते. 'स्कायमेट'ने हा अंदाज व्यक्त केला असला तरी भारतीय हवामान विभागाने अद्याप २०२६ च्या मान्सून अंदाज जाहीर केलेला नाही. हवामान विभागाचा मान्सूनचा अंदाज एप्रिल अखेरीस जाहीर होण्याची शक्यता आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# जागतिक कोकणी भाषा दिन

आज ९ एप्रिल आजचा दिवस जागतिक कोकणी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो. प्रख्यात कोकणी कार्यकर्ते शेनाई गोंबेब यांच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो. कोकणी भाषेला प्रोत्साहन देणे आणि तिची प्रतिष्ठा वाढवणे, कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार करणे हे मुख्य उद्देश हा दिवस साजरा करण्यामागे आहे. या दिवशी कोकणी भाषेतील लेखकांचा आणि कलाकारांचा गौरव केला जातो. मराठीची धाकटी बहीण म्हणून कोकणी भाषा ओळखली जाते. कोकणी भाषा म्हणजे गोव्याची भाषा असा एक समज आहे कारण कोकणी ही गोव्याची राजभाषा आहे. गोव्याशिवाय महाराष्ट्र, कर्नाटक आणि केरळातील काही भागात कोकणी भाषा मोठ्या प्रमाणावर बोलली जाते. कोकणी राज्यघटनेच्या आठव्या परिशिष्टात भाषा म्हणून समाविष्ट झाली आहे. कोकणी ही एकसंध बोलीभाषा नसून तिच्यात एकूण आठ प्रकार गणले जातात. गोव्यात बोलली जाणारी कोकणी भाषा ही त्यापैकीच एक असून तिच्यात ख्रिश्चनांची कोकणी आणि हिंदूंची कोकणी असे दोन प्रकार आहेत. ख्रिश्चनांच्या कोकणीवर पोर्तीगीज भाषेचा प्रभाव आहे. महाराष्ट्रातील कोकण भागात बोलली जाणारी कोकणी ही वेगळी आहे. शिवाय वारली, कोणकोणी, डांगी, चित्पावणी, मालवणी वैगरे अन्य बोलीभाषा कोकणाच्या उपभाषा आहेत. इंडो आर्यन भाषांत कोकणी ही सर्वात दक्षिण टोकाकडील भाषा आहे. तिचे नाते मराठी व गुजरातीशी आहे. कर्नाटक आणि केरळमध्ये बोलल्या जाणाऱ्या कोकणी भाषेत द्रविड भाषेतील अनेक मूळ शब्द आहेत. कोकणी बोली भाषा असणाऱ्या लोकांची संख्या एक कोटीच्या घरात आहे. कोकणी ही मराठीची जवळची भाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा द्यावा का याबाबत मतभिन्नता आहे. अनेकजण कोकणी ही मराठीचीच उपभाषा असल्याने तिला स्वतंत्र भाषेचा दर्जा देऊ नये या मताचे आहेत तर कोकणी भाषेचे अभ्यासक व जाणकार कोकणी ही स्वतंत्र भाषा असल्याचे ठामपणे सांगतात. हा वाद लवकर संपणार नाही कारण दोन्ही भाषा सारख्याच आहेत. अगदी साध्या गोष्टी बघितल्या तरी ते आपल्या लक्षात येईल मराठीतील मला या शब्दाला कोकणीत म्हाकां असे म्हणतात, मराठीत इकडे, इथे तर कोकणीत होतो हांगा. कोकणी आणि मराठी भाषा जवळजवळ सारखीच आहे. कोकणी जर सावकाश बोलली तर कोणत्याही मराठी माणसाला त्याचा अर्थ सहज समजेल. कोकणी भाषा ही जगातील सर्वात गोड भाषेपैकी एक आहे. कोकणी भाषेत बोलणे तसेच कोकणी भाषा ऐकणे ही एक मौजच आहे. कोकणी भाषेसारखा आपलेपणा इतर कोणत्याच भाषेत नाही म्हणूनच कोकणी भाषा सर्वांना आपली भाषा वाटते. कोकणी भाषेला मानाचा ज्ञानपीठ पुरस्कारही मिळाला आहे. कोकणी भाषेतील ज्येष्ठ साहित्यिक रवींद्र कोळेकर यांना २००८ साली तर दामोदर मावजो यांना २०२१ साली मानाच्या ज्ञानपीठ पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. कोकणी भाषेचा जास्तीतजास्त प्रसार आणि प्रचार व्हावा हा जागतिक कोकणी भाषा दिनाचा मुख्य उद्देश आहे. हा उद्देश सफल व्हावा हीच सदिच्छा व्यक्त करून कोकणी भाषा बोलणाऱ्या सर्व लोकांना जागतिक कोकणी भाषा दिनाच्या मनापासून शुभेच्छा देतो.



**– श्याम ठाणेदार, पुणे**

कृषीवल | रायगड, नवी मुंबई, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग
| आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७
| RGD/016/2026-2028



## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.
**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा) ९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**

**- मुख्य संपादक, कृषीवल**

**आजचे अन्नदाते**

**प्रभावती महादेव पाटील स्मरणार्थ अलिबाग**

# वरसगाव-भिरा फाटा धोकादायक

## • उड्डाणपूलअभावी अपघातांचे प्रमाण वाढले • ठेकेदारांचा चुकीचा निर्णय

**| कोलाड | प्रतिनिधी |**

मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग ६६ वरील वरसगाव-भिरा फाट्यावर उड्डाणपूल न बनविल्यामुळे या महामार्गांवर अपघाताची मालिका सुरु आहे. याला जबाबदार मुंबई-गोवा हायवेचे अधिकारी तसेच संबंधित ठेकेदार हे असल्याचे बोलले जात आहेत. कारण मुंबई-गोवा हायवेवरील अनेक छोट्या गावासाठी उड्डाणपूल बनविण्यात आला आहे. परंतु, मुरुड-भिरा मार्गांवरून पुणे बाजूकडे जाणाऱ्या राज्यमार्गांवरील भिरा फाट्यावर उड्डाणपूल असावा, असे महामार्ग अधिकारी व संबंधित ठेकेदार यांना जाणीव का झाली नाही का?, मुंबई-गोवा मार्गांवरील भिरा फाट्यावर डोळे मिटून सर्व्हे केला काय? असे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवासी नागरिकांकडून बोलले जात आहे.



मुंबई-गोवा महामार्गाच्या चौपदरीकरणाचे काम गेली १७ वर्षांपासून सुरु असून ते एका वर्षात पूर्णही होईल. यामुळे या महामार्गांवर वाहनांचा वेग वाढणार आहे. वाहनांचा वेग कमी करण्यासाठी येथे गतिरोधक बसविण्यात आले आहेत. तेही निकृष्ठ दर्जाचे असल्यामुळे हे गतिरोधक वेगाची नशा अपघाताचे कारण ठरत आहे. या गतिरोधकामुळे गेल्या महिन्यात एकाच दिवशी दोन दुचाकीस्वारांचा अपघात झाला. या अपघातात दुचाकीस्वार गंभीर जखमी झाले होते. तसेच, गेल्या आठवड्यात दोन कार एकमेकांना आदळून अपघात झाला. यात सर्व प्रवाशांना किरकोळ मार लागल्यामुळे ते थोडक्यात बचावले. परंतु दरवेळी असेच होईल असे नाही.

मुंबई-गोवा महामार्गांवरून गोव्याकडून मुंबईकडे जाणाऱ्या लेनवर आंबेवाडी बाजारपेठेत उड्डाणपुलाचे काम सुरु असल्यामुळे त्या ठिकाणी मातीचे ढिगारे ठेवले आहेत. त्या ठिकाणी काम सुरु असल्याचे फलक लावण्यात आले आहेत. परंतु, ते फक्त दिवसा दिसण्यासाठी सक्षम आहेत. रात्रीच्या वेळी या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे रिप्लेक्टर तसेच कोणत्याही प्रकारच्या प्रकाशाची सोय नसल्यामुळे वाहन चालकांना पुढील परिस्थितीची कल्पना येत नाही. यामुळे या ठिकाणी अपघाताचा धोका वाढला आहे.

> “ मुंबई-गोवा महामार्गाचे काम पूर्ण झाल्यानंतर भिरा फाट्यावर वाहतूकीचा वेग अधिक वाढणार आहे. यामुळे या मार्गांवरून प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या जिवाला धोका निर्माण झाला आहे. येथे अंडरपास रस्ता होणे महत्वाचे होते. परंतु, याची गरज का वाटली नाही, ही मोठी आश्चर्याची गोष्ट आहे. आता येथे ब्लिकिंग सिग्नल लावणे आवश्यक आहे. गेल्या वर्षांपासून येथे पथदिवे लावण्यात आले आहेत. परंतु अद्यापही ते सुरु केले नाहीत. तसेच, हायवेचे अधिकारी व संबंधित ठेकेदार यांनी येथील अपघात टाळण्यासाठी उपाययोजना करावी.
>
> – विश्वास बागुल, कुणबी समाज युवा कार्यकर्ते, वरसगांव ”

## इंस्टाग्रामवरील मैत्री पडली महागात

### तरूणाची लाखोंची फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

समाज माध्यमावरील ओळखीचा गैरफायदा घेत एका तरुणाची तब्बल १५ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा प्रकार पनवेलमध्ये उघडकीस आला आहे. बनावट इंस्टाग्राम आयडीच्या माध्यमातून मैत्री करून आजारपणाचे कारण सांगत पैसे उकळल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी पनवेलमध्ये राहणाऱ्या २१ वर्षीय तरूणाने पनवेल शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

मागील वर्षी २० डिसेंबर ते ४ एप्रिल या कालावधीत एका बनावट इंस्टाग्राम आयडीद्वारे तरूणाशी संपर्क साधण्यात आला. संबंधित व्यक्तीने स्वतःला ‘साक्षी’ नावाची मुलगी असल्याचे भासवून तिच्या वडिलांचे आजारपणासाठी आणि शस्त्रक्रियेसाठी पैशांची गरज असल्याचे सांगितले. यानंतर मोबाईलवरील व्हॉट्सॲपवरून ‘निखील माने’ नावाचा व्यक्त संपर्क साधत होता. त्याने स्व:ताची ओळख साक्षीच्या मैत्रिणीचा भाऊ असल्याचे सांगितले होते. विश्वास संपादन केल्यानंतर आरोपींनी तरूणाकडून टप्प्याटप्प्याने १४ लाख रुपये रोख आणि १ लाख रुपये गुगल पेच्या माध्यमातून उकळले.

## ज्ञानांकुर स्कूल खांबचे घवघवीत यश

### • स्काऊट गाईड स्पर्धेत पाच विद्यार्थ्यांना राज्य पुरस्कार प्रदान

**| कोलाड | प्रतिनिधी |**

रोहा तालुक्यातील एम.एन. लोखंडे एज्युकेशन अँड वेलफेअर सोसायटी खांबचे ज्ञानांकुर इंग्लिश मेडीयम स्कूल खांब येथील पाच विद्यार्थ्यांनी भोर (पुणे) येथे झालेल्या स्काऊट गाईट राज्यपुरस्कार चाचणी परीक्षेत चांगले गुण प्राप्त करून राज्य पुरस्कार प्राप्त केले. या यशाबद्दल पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे विविध स्तरावरून अभिनंदन करण्यात येत आहे.



सन २०२५-२६ या वर्षाकरिता स्काऊट गाईट राज्य पुरस्कारासाठी ही स्पर्धा परीक्षा भोर (पुणे) येथे दि.८ फेब्रुवारी ते ११ फेब्रुवारी या कालावधीत घेण्यात आली. या परीक्षेसाठी रायगड, पालघर, ठाणे, दक्षिण मुंबई येथील एकूण १४२ स्काऊट परीक्षेला बसले होते. या स्पर्धेत तोंडी, प्रात्येक्षिक, लेखी अशा परीक्षेत एकूण ३०० गुणांची परीक्षा घेण्यात आली. या स्पर्धेसाठी रायगड जिल्हा संघटन आयुक्त राठोड, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त स्काऊट प्रशांत गायकवाड, जिल्हा प्रशिक्षण आयुक्त गाईड सरिता डफल, वर्षा दळवी, गमरे, ज्ञानांकुर स्कूलचे संस्थापक स्काऊटर ॲड.रविंद्र लोखंडे, मुख्याध्यापिका रिया लोखंडे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.

या स्काऊट गाईट राज्य पुरस्काराच्या परीक्षेत ज्ञानांकुर स्कूलचे चैतन्य चंद्रकांत चितळकर, कर्तव्य सुधीर लोखंड, युवराज राजेश चव्हाण, आदेश प्रदीप लाडगे, विघ्नेश घनश्याम नाकटे या पाच विद्यार्थ्यांनी चांगले गुण संपादन करून राज्य पुरस्कार प्राप्त केला. या यशाबद्दल स्कूलचे संस्थापक, मुख्याध्यापिका, स्कूल कमेटी सभासद, शिक्षक वृंद, पालक वर्ग, विद्यार्थी तसेच विविध स्तरावरून पुरस्कार प्राप्त विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## उदंड प्रतिसादाने ‘महालक्ष्मी सरस’ प्रदर्शनाची सांगता

### २२ कोटींच्या वर ‘रेकॉर्डब्रेक’ उलाढाल

**| मुंबई | प्रतिनिधी |**

ग्रामीण महाराष्ट्राच्या कष्टाचा सुगंध, कष्टकरी माऊलींच्या हाताची जादू आणि आधुनिक तंत्रज्ञानाची जोड यांचा अभूतपूर्व महोत्सव नवी मुंबईच्या वाशी येथे पार पडला. २४ मार्चपासून सुरू असलेल्या ‘महालक्ष्मी सरस-२०२६’ प्रदर्शनाने निरोप घेताना यशाचे सर्व विक्रम मोडीत काढले. १३ दिवसांत तब्बल २२ कोटी रुपयांची रेकॉर्डब्रेक विक्री करून ग्रामीण महिलांनी सिडको एक्झिबिशन सेंटरमध्ये उद्योजकतेचा नवा इतिहास लिहिला.

मुंबईकरांनी ४९० स्टॉल्सवर दाखवलेला हा उदंड प्रतिसाद केवळ खरेदीपुरता मर्यादित नव्हता तर तो ग्रामीण अर्थव्यवस्थेला दिलेला एक भक्कम आधार ठरला.

यंदाच्या प्रदर्शनाचे सर्वात मोठे ‘गेमचेंजर’ ठरले ते म्हणजे आयोजकांनी पुरवलेल्या नाविन्यपूर्ण सुविधा. २५ किलोमीटरच्या परिघात मोफत घरपोच सेवा देण्याचा निर्णय महत्वाचा ठरला. आमच्या हातात पिशव्यांचे ओझे नको, असे म्हणणाऱ्या मुंबईकरांनी या सुविधेमुळे पोतीभर धान्य, मसाले, सेंद्रिय गुळ आणि हस्तकलेच्या वस्तूंची मनमुराद खरेदी केली. घरपोच सुविधेमुळे खरेदीचा वेग वाढला आणि उलाढालीने १० कोटींचा टप्पा ओलांडून थेट २२ कोटींवर झेप घेतली.

खरेदीच्या गर्दीत ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांची गैरसोय टाळण्यासाठी विशेष ‘क्लॉक रूम’ आणि विश्रांती कक्षाची सोय होती. कुटुंबीय खरेदी करत असताना ज्येष्ठांना येथे सुरक्षित बसता येत होते, या संवेदनशील निर्णयाचे सर्वत्र कौतुक झाले. पहिल्यांदाच राबविण्यात आलेल्या या सुविधेमुळे ग्राहकांचा खरेदीचा उत्साह कैकपटीने वाढला.

## ‘चित्रपताका’ चित्रपट महोत्सवाचे आयोजन

**मुंबई :** राज्य शासनाचा अधिकृत ‘चित्रपताका’ चित्रपट महोत्सव यंदा १२ ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे आयोजित करण्यात येईल, अशी माहिती सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिली. सांस्कृतिक कार्य व माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. आशिष शेलार यांच्या उपस्थितीत पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी, प्रभादेवी, मुंबई येथे सांस्कृतिक कार्य विभागाची आढावा बैठक झाली. यावेळी मंत्री ॲड. शेलार यांनी माहिती दिली.

## गोखले महाविद्यालयात निरोप समारंभ

**श्रीवर्धन :** श्रीवर्धन येथील गोखले एज्युकेशन सोसायटीच्या, कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ उत्साहात पार पडला.

समारंभाची सुरुवात उपप्राचार्य प्रा. किशोर लहारे यांच्या हस्ते दीप प्रज्वलन व सरस्वती पूजनाने झाली. आयोजनाचा हेतू खुशबू गांधी या विद्यार्थिनीने प्रास्ताविकात स्पष्ट केला. डॉ. कल्याणी नाझरे, प्रा. बी.यु. पाटील, प्रा. दिपाली पाठराबे यांनी आपल्या मनोगतातून विद्यार्थ्यांना पुढील यशस्वी भवितव्यासाठी मार्गदर्शन केले व शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी आपल्या आठवणी सांगून महाविद्यालयीन जीवनामध्ये त्यांची सर्वांगीण प्रगती झाली, याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. अध्यक्षीय समारोपामध्ये उपप्राचार्य प्रा. किशोर लहारे यांनी विद्यार्थ्यांच्या जडणघडणीमध्ये महाविद्यालयाचा वाटा किती महत्त्वाचा असतो, हे समर्पक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. या कार्यक्रमाचे आयोजन प्रथम वर्ष विज्ञान व द्वितीय वर्ष वाणिज्य या वर्गातील विद्यार्थ्यांनी केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन अल्मास धनसे आणि आदिल करदमे या विद्यार्थ्यांनी केले. सुजाता राठोड या विद्यार्थिनीने उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

## ‘आपलं मंत्रालय’ अंकाचे प्रकाशन

**मुंबई :** माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या ‘आपलं मंत्रालय’ या गृहपत्रिकेच्या मार्च २०२६ अंकाचे प्रकाशन महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव (मावज) अजय भोसले, माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे संचालक डॉ. किशोर गांगुर्डे उपस्थित होते. आपलं मंत्रालय गृहपत्रिकेच्या या अंकामध्ये विविध विषयांचा आशयपूर्ण आढावा घेण्यात आला आहे.

# शालेय सहलींतून एसटीला १२७ कोटींचे उत्पन्न

## •परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची माहिती

**| मुंबई | प्रतिनिधी |**

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षात शालेय सहलींसाठी २५ हजार ५५८ बस फेऱ्यांच्या माध्यमातून लाखो विद्यार्थ्यांची सुरक्षित वाहतूक केली. यात तब्बल १२७ कोटी १८ लाख रुपयांचे विक्रमी उत्पन्न मिळवले आहे. हे उत्पन्न मागील वर्षाच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाखांनी अधिक असून, शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षित सहलींसाठी एसटीशिवाय पर्याय नाही, असे परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी सांगितले.



मंत्री सरनाईक म्हणाले की, शैक्षणिक वर्षात विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेट देण्यासाठी शाळा आणि महाविद्यालयांकडून सहली आयोजित केल्या जातात. या सहली एसटीच्या माध्यमातून आयोजित केल्यास विद्यार्थ्यांना प्रवासी भाड्यात शासनाकडून ५० टक्के सवलत दिली जाते. त्यामुळे एसटीमार्फत आयोजित सहली सुरक्षित, विश्वासार्ह आणि माफक दरात उपलब्ध होतात. विशेषतः ग्रामीण भागातील लाखो विद्यार्थींना याचा मोठा लाभ होतो.

यंदाच्या शैक्षणिक वर्षात राज्यभरातील विविध शाळा व महाविद्यालयांच्या मागणीनुसार एसटी महामंडळाने तब्बल २५ हजार ५५८ बस फेऱ्या उपलब्ध करून दिल्या. या फेऱ्यांद्वारे लाखो विद्यार्थ्यांनी विविध धार्मिक व ऐतिहासिक पर्यटन स्थळांना भेटी देत सुरक्षित प्रवास केला. या उपक्रमातून महामंडळाला १२७ कोटी १८ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले असून, ते मागील वर्षाच्या तुलनेत ३३ कोटी २९ लाखांनी अधिक आहे.

## सोनसाखळीची चोरी

**पनवेल :** कळंबोलीतील ५५ वर्षीय व्यापारी हे त्यांच्या स्टील मार्केटमधील गोदामावरून दुचाकीने तळोजा येथे गेले होते. परत येत असताना दोन युवक त्यांच्या दुचाकीचा पाठलाग करत हाते. स्टील मार्केटमधील गोदाम क्रमांक १६४० समोरील रस्त्यावर त्यांच्या दुचाकीचा वेग कमी होताच, पाठलाग करणाऱ्या चोरट्यांपैकी एकाने त्यांच्या गळ्यातील सुमारे तीन लाख रुपयांची सोनसाखळी हिसकावली. या झटापटीत व्यापाऱ्याच्या मानेस दुखापत झाली. त्यानंतर त्यांनी तातडीने पोलीस ठाण्यात याबाबत तक्रार केली.

### लोकसहभागातून सीसीटीव्ही प्रकल्प कार्यान्वित | दिघी सागरी पोलिसांकडून कौतुक

# वेळासमध्ये गुन्हेगारांवर राहणार ‘तिसरी नजर’

**| श्रीवर्धन/दिघी | प्रतिनिधी |**

श्रीवर्धन तालुक्यातील वेळास परिसरात गेल्या काही दिवसांपासून वाढलेल्या चोरीच्या घटनांनी ग्रामस्थांची झोप उडवली होती. या समस्येवर केवळ चर्चा न करता, वेळासच्या ग्रामस्थांनी आणि मित्रपरिवाराने एकजुटीने पाऊल उचलले आहे. ‘आपलं गाव, आपली सुरक्षा’ या ध्येयाने लोकसहभागातून संपूर्ण परिसरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षा यंत्रणा सज्ज करण्यात आली आहे.

वाढत्या चोरीच्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले होते. ही भीती दूर करण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते धवल तवसाळकर व त्यांच्या मित्रपरिवाराने पुढाकार घेऊन ग्रामपंचायत आणि



स्थानिक ग्रामस्थांच्या संयुक्त सहकार्याने निधी उभारून हा प्रकल्प मार्गी लावला. गावातील प्रमुख तीन रस्त्यांवर, जेथून वर्दळ जास्त असते, अशा मोक्याच्या ठिकाणी हे कॅमेरे बसवण्यात आले आहेत. या प्रकल्पाचे अधिकृत उद्घाटन दिघी सागरी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष आवटी यांच्या हस्ते पार पडले. यावेळी बोलताना आवटी म्हणाले की, ‘गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर ही काळाची गरज आहे. ग्रामस्थांनी स्वखर्चातून केलेली ही सोय पोलिसांच्या तपासाला गती देणारी ठरेल. या उपक्रमामुळे गुन्हेगारांवर वचक निर्माण होईल.’ त्यांनी या कार्यासाठी धवल तवसाळकर यांचे विशेष अभिनंदन केले.

या उपक्रमासाठी माजी सरपंच सुरेश धोपट, सुदर्शन शिळकर, बावा मुरकर, विकेश लाड, संदीप दिवेकर, ऋतुराज शिळकर, उदय पाटील, संतोष शिळकर, नितेश तोंडलेकर, साहिल दळवी, विनोद लाड, आयुष दिवेकर, गणेश आडवीलकर, अनंत अपराध, अनुज अपराध, अरुण शिरधनकर यांसह वेळास परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमामुळे महिला आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये सुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे.

### आगामी काळात व्याप्ती वाढवणार

गावाच्या सुरक्षिततेबाबत बोलताना धवल तवसाळकर यांनी सांगितले की, मित्रपरिवार आणि ग्रामस्थांच्या मदतीमुळेच हे शक्य झाले आहे. सध्या मुख्य रस्ते सुरक्षित केले आहेत, मात्र भविष्यात गावातील इतर अंतर्गत गल्ल्या आणि सार्वजनिक ठिकाणीही सीसीटीव्हीच्या कक्षेत आणण्याचा आमचा मानस आहे.

## निवडक



### डॉ.ॲड.रवींद्र राठोड पुरस्काराने सन्मानित

**पाली /बेणसे :** माणगाव येथील नामदेव सुर्वे लॉ कॉलेजचे प्राचार्य डॉ. ॲड. रवींद्र पांडुरंग राठोड यांना सन २०२६ चा मानाचा महाराष्ट्र गौरव रत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. पुणे येथे रविवारी (दि.५) एका दिमाखदार सोहळ्यात त्यांना या पुरस्काराने गौरविण्यात आले. विद्याराज फाऊंडेशन प्रस्तुत आणि शिवमनी स्टुडिओ आयोजित या सोहळ्यात महाराष्ट्रातील विविध क्षेत्रांतील मान्यवरांच्या उपस्थितीत डॉ. राठोड यांना हा सन्मान देण्यात आला. रायगड जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात, विशेषतः विधी शिक्षणाच्या प्रसारात आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी त्यांनी केलेले कार्य अत्यंत मोलाचे आहे. त्यांच्या या उत्कृष्ट कार्यामुळे समाजाला नवी दिशा मिळत असून महाराष्ट्राच्या गौरवात भर पडली आहे. त्यामुळेच त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. या पुरस्काराबद्दल त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना तांदूळ वाटप



**चिरनेर :** जे.ए. स्पोर्टस् क्रिकेट संघ खोपटे बांधपाडा यांच्यातर्फे चिरनेर येथील आश्रम शाळेतील विद्यार्थ्यांना १०४ किलो तांदळाचे व खाऊचे वाटप करण्यात आले. जे.ए. स्पोर्टस् क्रिकेट संघ खोपटे बांधपाडा यांच्या संयुक्त विद्यमाने नाईट अंडरआर्म क्रिकेट सामन्यांचे आयोजन करण्यात येते. या स्पर्धेच्या माध्यमातून जे.ए.स्पोर्ट्स संघाला जो नफा मिळाला त्या नफ्याच्या पैशातून चिरनेर येथील श्री स्वामी समर्थ शिक्षण प्रसारक मंडळ, वैराग ता.बार्शी, जि.सोलापूर संचलित अनुदानित प्राथमिक आश्रम शाळेचे विद्यार्थ्यांना ही मदत करण्यात आली. हा उपक्रम रविवारी (दि.५) पार पडला असून २०० गरीब विद्यार्थ्यांनी याचा लाभ घेतला. या उपक्रमाचे सर्वच स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.



### वाढदिवसाच्या निमित्ताने विविध कार्यक्रम

**रसायनी :** किल्ले शिवनेरीचे सुपुत्र, जगदंबा युवा मंच प्रतिष्ठानचे संस्थापक/ अध्यक्ष व्यापारी दिगंबर ढवळे यांच्या वाढदिवस विविध कार्यक्रमांनी साजरा करण्यात आला. कार्यक्रमप्रसंगी वारकरी संप्रदायाचे भूषण दादा पडळकर, सुरेश वेटेकर, विवेकानंद पतसंस्थेचे अध्यक्ष नंदू शेठ वाणी, संचालक हनुमंत शेठ गव्हाणे, भाजी मार्केटचे सुप्रसिद्ध व्यापारी महादेव कोळेकर, सूर्यकांत झेंडे, विकास गाढवे, संदेश ढवळे, दत्ताशेठ कोळेकर, स्वप्निल हांडे, सतीश कोकणे, फिटनेस कोच धनंजय साळेकर, किशोर इंदोरे, सुनील डोके, विवेकानंद शिवदास पडवळ, सुरेश पाबळे, निखिल भोर, पत्रकार अमोल शेरकर, संजय मोरडे तसेच इतर सहकारी यांनी शुभेच्छा दिल्या. दिगंबर यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त संपूर्ण सप्ताहात परिसरात २०० वृक्षांचे वृक्षारोपण करण्यात आले. तसेच, सामाजिक कार्य करत असताना वृद्धाश्रमामध्ये फळवाटप, असंख्य गरजू लोकांना अन्नदान, भाजी मार्केटमधील खेळाडूंना खेळाचे साहित्य वाटप असे मोलाचे योगदान देऊन आपला वाढदिवस साजरा केला.

### उंच काट्या स्पर्धेत मरिदेवी मंडळ विजेता



**खारेपाट :** अलिबाग तालुक्यातील बहिरिचा पाडा येथे श्री बहिरीदेवाच्या यात्रेनिमित्त भव्य उंच काट्याच्या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या होत्या. या स्पर्धेत (नेवेरेव काठी) मरीदेवी प्रसन्न मंडळ प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला. तर द्वितीय क्रमांक श्री बापूजी प्रसन्न व तृतीय क्रमांक श्री विठ्ठल प्रसन्न हे मंडळ विजेते ठरले. या स्पर्धेत अनेक मंडळांचा सहभाग होता. या स्पर्धेच्या शुभारंभाप्रसंगी श्री बहिरीदेव मंडळाचे अध्यक्ष तथा सिने अभिनेते व माजी खासदार राज बब्बर यांचे सचिव हरिचंद्र पाटील, राजेश पाटील, चंद्रकांत पाटील सुनील म्हात्रे, भगवान म्हात्रे, डॉ. मनोज पाटील, महेश पाटील, गावातील पंच कमिटी व हजारोंच्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

### रोहा-येरळ एसटी दोन दिवसाआड नादुरुस्त

**सुतारवाडी :** रोहा आगारातून सुटणाऱ्या एसटी बस व्यवस्थित तपासणी न करता सोडल्या जात आहेत. या बस नादुरुस्त होऊन तासन्‌तास उभ्या असतात. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रवाशांचे हाल होत आहेत. सविस्तर माहिती अशी की, रोहा आगारातून सकाळी ७.३० वाजता सुटणारी रोहा-



येरळ ही गाडी सुतारवडे येथे सकाळी ८.३० वाजता पोहोचते. त्यानंतर सुतारवाडीमार्गे धगडवाडीकडे जाऊन पुन्हा प्रवासी घेऊन सुतारवडीकडे येते. तेथून ती कोलाड येथे गेल्यानंतर भाले पहूरकडे जाते. नंतर ती रोहा येथे रवाना होते. मात्र चार दिवसांपूर्वी ही गाडी सुतारवाडी येथे आल्यानंतर नादुरुस्त झाली आणि तेथेच मेकॅनिकल येईपर्यंत उभी होती. त्यामुळे प्रवाशांना खासगी वाहनातून प्रवास करावा लागला. त्यानंतर मंगळवारी (दि.७) ही गाडी सकाळी रोहा येथून सुतारवाडी नाक्यावर आल्यानंतर पुन्हा एकदा नादुरुस्त झाली. त्यामुळे प्रवाशांना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागला. ग्रामीण भागात एक तर मोजक्याच गाड्या येत असतात. अशावेळी एसटीच्या गाड्या बंद पडल्या तर प्रवाशांना मोठा त्रास सहन करावा लागतो. याबाबत आगार प्रमुखांनी लक्ष देऊन प्रवाशांचे होणारे हाल थांबवावेत, अशी ग्रामीण भागातील प्रवाशांची मागणी आहे.

# वन विभागाने भागवली वन्यप्राण्यांची तहान

## • प्राणीप्रेमींनी केले समाधान व्यक्त • वनपालांनी घेतली दिवसरात्र मेहनत

**। आगरदांडा । प्रतिनिधी ।**

मुरुड तालुक्यातील सुपेगाव येथील सुमारे ५४ कि. मी. क्षेत्र परिसरात फणसाड अभयारण्य क्षेत्राचा विस्तार झालेला आहे. नवाब सरकाराने हे अभयारण्य स्वातंत्र्य पुर्व काळापासून सुरक्षीत केलेला आहे. या अभयारण्यात १९ प्रकारचे वन्यप्राणी आहेत. सध्या वाढत्या उष्णतेमुळे कहर केला असुन जिव कसावित होत आहे. ऐन मार्च महिन्याच्या सुरुवातीलाच उन्हाची तीव्रता वाढली असून उष्णतेच्या तप्त झळा जानवत असल्याने नदी, नाले, जंगलातील पाणवठे पाण्याअभावी कोरडे पडल्याने वन प्राण्यांच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जंगलात पाण्याअभावी कोरडे पडलेले पाणवठे वनविभागाच्या प्रयत्नाने पाण्याने तुडुंब भरले आहे. त्यामुळे वनवन भटकंती करणाऱ्या वन्यप्राण्यांचे प्रश्न सुटला आहे.



या जंगलात बिबट्या, सांबर, भेकरे, डुक्कर, षेकरु, पिसोरी, ससा, कालामांजर, रानमांजर, जवादा, सालिंदर, मुंगा, वानर, मोर, रान कुत्रा, गवा, गिधाड, आदी प्राण्यांचे वास्तव्य आहे. तसेच या अभयरण्यात ७१८ प्रकारचे वृक्ष, १९ प्रकारचे सस्तन प्राणी, २७ प्रकारचे साप, १९० प्रकारचे रंगी-बेरंगी पक्षी, १३० प्रकारची फुलपाखरे यामध्ये ब्लु मॉरमॉन, मॅप, व आदी फुलपाखरु दिसून येतात. या बरोबर नाग, फुरसे, घोणस, मण्यार असे विषारी व हरणटोळ, अजगर सारखे बिनविषारी साप येथे आढळत असतात. या प्राण्यांना पुर्वीपासून पिण्यासाठी जंगल भागात नैसर्गिक पाण्याची २७ जलस्त्रोत्र आहेत. परंतु फेब्रुवारी, मार्च, एप्रिल व मे महिन्याच्या कडक उन्हाळ्याच्या वाढत्या तापमानामुळे पाण्याचे तलाव सुके होत जाते यामुळे वन्य प्राण्यांची पाण्यासाठी भटकंती होऊ नये. मानव वस्तीत जाऊन नये त्याकरिता फणसाड अभयारण्यामध्ये असणाऱ्या नैसर्गिक केतकीची गाण, सावरट तलाव, चिखलगाण, धरणाची गाण, सव्रत तलाव, बांध तलाव असे विविध २७ पाण्याचे पानवाट्यांमध्ये आठवड्यातून एकदा टेम्पोव्दारे हाजोरो लिटर पाणी सोडण्यात येत असल्याने जलस्रोत पाण्याने तुडुंब भरल्याने या उपक्रमांमुळे वन प्राण्यांच्या तृष्ण तृप्तींची सोय केली गेल्याने प्राणी-पक्षी प्रेमींनी समाधान व्यक्त केले आहे.

> “ वनक्षेत्रातील आटलेले नदी-नाले व नैसर्गिक जलस्रोत बघता वनविभागाने वनक्षेत्रातील वन्य जीवांसह पशुपक्ष्यांची तहान भागवण्यासाठी वनक्षेत्रात परिसरात कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत.फेब्रुवारी महिन्यांपासून निसर्ग जलस्त्रोत पाणी कमी होत असल्याने वन्य प्राण्यांची गैर सोय होऊ नये त्याकरिता फणसाड अभयारण्या मार्फत कृत्रिम पाणवठे दुरुस्त करून त्यामध्ये हजारो लिटर टेम्पोव्दारे पाणी सोडण्याची व्यवस्था केली आहे. याकरिता वनपाल दिवसरात्र मेहनत घेत आहेत.
> -वनपाल अधिकारी ”

# माणगावात आंतरराष्ट्रीय रसायनशास्त्र परिषद

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शिक्षण प्रसारक मंडळाच्या द. ग. तटकरे महाविद्यालयात शनिवारी (दि.११) एप्रिल रोजी रसायनशास्त्रातील उदयोन्मुख प्रवाह : सीमांपलीकडील नवोपक्रम या विषयावर एकदिवसीय आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे.

ग्रामीण भागातील महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक उपक्रम राबविण्याची ही उल्लेखनीय परंपरा कायम राखत, या परिषदेच्या माध्यमातून जागतिक स्तरावरील संशोधन व ज्ञान देवाणघेवाणीसाठी व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाणार आहे.

महाविद्यालयाच्या विज्ञान विभाग आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष आयक्यूएसी यांच्या संयुक्त विद्यमाने होणाऱ्या या परिषदेचे उद्घाटन शनिवार, दि. ११ एप्रिल रोजी होणार असून, देशातील विविध राज्यांबरोबरच आंतरराष्ट्रीय स्तरावरील संशोधक, प्राध्यापक आणि तज्ज्ञ यांचा सहभाग अपेक्षित आहे. या परिषदेकरिता डॉ. बळीराम गायकवाड, डॉ. विश्वनाथ पाटील, डॉ. मुकुंद तंटक, प्राचार्य डॉ. एस. के. पाटील, डॉ. इक्बाल शेख, डॉ. मधुकर बडगुजर, डॉ. संजय सोनावले हे विविध विषयांवर आपले विचार मांडणार आहेत.

या परिषदेचा मुख्य उद्देश म्हणजे रासायनिक विज्ञान क्षेत्रातील अद्ययावत संशोधन, आधुनिक तंत्रज्ञान आणि आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन यांचा व्यापक आढावा घेणे हा आहे. माणगाव सारख्या तालुक्याच्या ठिकाणी अशा आंतरराष्ट्रीय दर्जाच्या परिषदांचे सातत्याने आयोजन होत असल्याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. राजीव अशोक साबळे यांनी समाधान व्यक्त करत आयोजकांना शुभेच्छा दिल्या.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्राचार्य डॉ. बी. एम. खामकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य व मान्यवरांची उपस्थिती लाभणार आहे. या परिषदेसाठी प्रमुख संयोजक सहाय्यक प्राध्यापक मेहरीन डावरे (संपर्क : ९१६८४३९७५३) तसेच समन्वयक डॉ. जे. आर. पांडेय (संपर्क : ९४२११६६८००) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# मुलींसाठी कर्करोगविरोधी लसीकरण

**। रसायनी । प्रतिनिधी ।**

गर्भाशय मुखाच्या कॅन्सरपासून मुलींचे संरक्षण करण्यासाठी शासनाने महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. १४ वर्षावरील मुलींना मोफत एचपीव्ही लसीकरण मोहीम सुरू केली आहे.चौक येथील ग्रामीण रुग्णालयांमध्ये ही लस उपलब्ध झाली असून तिचा शुभारंभ वैद्यकीय अधिक्षक डॉ. सविता कालेल यांच्याहस्ते करण्यात आला असून पालकांनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले. सध्या कमी वयातच गर्भाशय मुखाच्या कॅन्सरचे प्रमाण वाढताना दिसत आहे. भविष्यातील धोका टाळण्यासाठी मुलींना वेळेत लस देणे अत्यंत आवश्यक ठरत आहे. यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या आरोग्य विभागाने ही मोहीम राबवली आहे. बाजारात या लसीची किंमत सुमारे ४५०० रुपये असून, शासनाकडून ती पूर्णपणे मोफत दिली जात आहे. या लसीचे कोणतेही गंभीर दुष्परिणाम नसल्याचेही आरोग्य विभागाने स्पष्ट केले आहे. ज्या मुलीचे वय १४ वर्षांपेक्षा जास्त असणे आवश्यक आहे,वयाचा दाखला, आधार कार्ड, अपार कार्ड सोबत आणावे असे आवाहन वैद्यकीय अधीक्षक डॉ. सरीता कालेल यांनी केले आहे.

या कर्करोग प्रतिबंध लसी संदर्भात कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता मुलींना लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन प्रशासनाने केले आहे. अधिक माहितीसाठी १४१ हेल्पलाईनवर संपर्क साधता येईल.

# सातिर्जेत सर्पमित्राकडून नागाला जीवदान

**। सोगाव । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील सातिर्जे येथील रमेश म्हात्रे यांच्या अंगणात मंगळवारी (दि. ७) एप्रिल रोजी दुपारी साप आला होता. त्यांनी ताबडतोब किहीम सरपंच पिंट्या गायकवाड यांना सदरची माहिती देत सर्पमित्राला पाठवण्याची विनंती केली. त्यांनी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन चोंढी येथील सर्पमित्र असिफ मलिक यांना संपर्क साधून माहिती दिली. सर्पमित्र असिफ मलिक यांनी त्वरित प्रतिसाद देत घटनास्थळी धाव घेत सापाला पकडून कनकेश्वर येथील जंगलात सुरक्षित स्थळी सोडून देत जीवदान दिले. आसिफ हे गेली अनेक वर्षे चोंढी पंचक्रोशीत आढळलेल्या विविध प्रकारच्या सापांना पकडून त्यांना नैसर्गिक अधिवासात सोडून देत आहेत. यावेळी आसिफ यांनी नागरिकांना आवाहन केले की, सापांना न मारता ७८८७६८४६७८ नंबरवर संपर्क साधावा.





# रेवदंडा बाजारपेठेत वाहतुकी कोंडी

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंडा बाजारपेठेतील वाहतूक कोंडीची समस्या ऐरणीवर आली आहे. पार्कींग सुविधा नसल्याने खरेदीसाठी येणारे नागरिक रस्त्याच्या दुतर्फा वाहने उभी करतात, त्यामुळे आधीच अरुंद असलेला हा रस्ता आणखीनच अरुंद होतो. त्यामुळे ही समस्या उद्भवत असल्याचे दिसून येत आहे.

आजुबाजूच्या विविध गावांसह रेवदंडा, थेरोंडा, चौल, आग्राव आदी पंचक्रोशीतील ग्राहक खरेदीसाठी बाजारपेठेत येतात. मात्र, हा मुख्य रस्ता अरूंद असल्याने पार्कींगची समस्या प्रकर्षाने जाणवते. बाजारपेठेत गर्दीच्या वेळी वाहतुकीची कोंडी निर्माण होते. विशेषतः रेवदंडा पारनायावरील भाजी मार्केटमध्ये विक्रेते व खरेदीसाठी येणाऱ्या ग्राहकांची तोबा गर्दी होते. या गर्दीने वाहने जा-ये करण्यास अडथळा निर्माण झाल्याने वाहतूक कोंडी निर्माण होते. बाजारपेठेतील हा रस्ता अरुंद आहे. याच रस्त्याने मुरूड व अलिबागकडे वाहतूक सुरु असते. प्रवासी एसटी बसेस,अन्य मोठी वाहने यांची ये-जा मोठ्या प्रमाणात असते. एका वेळेस दोन मोठी वाहने आली तर मार्ग काढताना वाहनचालकांना कसरत करावी लागते. या गाड्या मार्गस्थ होईपर्यंत दोन्ही वाहतूक वाहने अडकून पडतात. यातून मार्ग काढण्यासाठी काहीतरी ठोस उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरु लागली आहे.

# रांजणपाड्यात ‘देव घरा आयला’ नाट्यप्रयोग

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

उरण तालुक्यातील रांजणपाडा येथील अष्टगंध सांस्कृतिक, कला, सामाजिक मंडळाच्या वतीने मरूआईच्या यात्रेनिमित्त आणि बाबीबाई त्रिंबक पाटील यांच्या स्मृतीप्रित्यर्थ मंगळवारी (दि.७) धनेश्वर म्हात्रे लिखित व हसूराम पाटील दिग्दर्शित तसेच प्रसाद कडू सहदिगदर्शीक दोन अंकी ‘देव घरा आयला’ नाटकाचा प्रयोग रांजणपाडा येथे सादर करण्यात आला.



यांप्रसंगी रवींद्र पाटील, मुरलीधर ठाकूर, वसंत चिर्लेकर, पांडुरंग पाटील, विद्याधर म्हात्रे, बळीशेठ घरत, रमाकांत म्हात्रे, दत्तात्रेय म्हात्रे, कैलासराजे घरत, जे. डी शेठ, धर्मबाई पाटील, मिलिंद ठाकूर, रमाकांत गावंड, धर्मदास घरत, माणिक नाईक, प्रवीण नाईक, रमाकांत घरत आदी मान्यवर उपस्थित होते.

नाटकात धनेश्वर म्हात्रे, हसूराम पाटील, कृष्णकांत म्हात्रे, दिगंबर कोळी, सुमित कुंभार, अशोक म्हात्रे, जयकिसन मोकल, वैभव म्हात्रे, प्रसाद कडू, वैशाली मोहिते, परीशा सरोदे, शिल्पा काकडे, अलंकार कडू, वैशाली मोहिते, परेशा सरोदे व रुद्र ठाकूर या सर्व कलाकारांनी आपापल्या भूमिकांना योग्य तो न्याय दिला.

अध्यक्ष अशोक म्हात्रे, सचिव दत्तात्रेय घरत, खजिनदार प्रज्योत पाटील गजानन म्हात्रे, नरेंद्र ठाकूर, यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले.

## मोबाईलची चोरी

**पनवेल** : शहरातील संत सावतामाळी हॉलच्या मागे एका महिलेचा मोबाईल अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुकानातून चोरल्याची घटना घडली आहे. नियाज पटेल यांच्या दुकानातून ५ हजार रुपये किमतीचा मोबाईल अज्ञात चोरट्याने त्यांच्या दुकानातून चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# जगताप महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ

**। महाड । प्रतिनिधी ।**

महाड येथील एम. एम. जगताप महाविद्यालयात (दि. ७ ) एप्रिल रोजी शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील तृतीय वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचा निरोप समारंभ तसेच वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा अत्यंत उत्साही आणि आनंददायी वातावरणात पार पडला.

यांप्रसंगी कनिष्ठ विद्यार्थ्यांनी वरिष्ठ विद्यार्थ्यांप्रती कृतज्ञता व्यक्त करत विविध सांस्कृतिक सादरीकरणांद्वारे महाविद्यालयीन आठवणींना उजाळा दिला. तृतीय वर्षातील विद्यार्थ्यांनीही आपल्या अनुभवांचे मनोगत व्यक्त करत शिक्षकांप्रती कृतज्ञता व्यक्त केली. काही विद्यार्थ्यांनी कविता, गाणी म्हणून कार्यक्रमात रंगत आणली.

यानंतर सांस्कृतिक, क्रीडा व इतर विविध उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक प्राप्त करणाऱ्या विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. कार्यक्रमाचा समारोप प्रा. स्वाती पवार यांच्या आभार प्रदर्शनाने झाला. शेवटी सर्व उपस्थित मान्यवर, विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रम विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अविस्मरणीय क्षण ठरला.

## भाजी मार्केटमध्ये खरेदी ग्राहकांची गर्दी | उन्हात-पावसात सहन करावा लागतो त्रास

# भाजी विक्रेत्यांना छत्रीचा आधार

**। रेवदंडा । प्रतिनिधी ।**

रेवदंड्यात भाजी मार्केटचा प्रश्न ऐरणीवर असून संबंधित प्रशासन तो सोडविण्यास अपयशी ठरले आहे. गेले अनेक वर्ष भाजी विक्रेत्यांना ऐन उन्हाळ्यात सावलीसाठी तर पावसाळ्यात पावसापासून बचाव करण्यासाठी चक्क छत्रीचा आधार घ्यावा लागत आहे.



रेवदंडा शहर मध्यवर्ती ठिकाण असल्याने आजूबाजूच्या पंचक्रोशीतील भाजी विक्रेते व्यवसायासाठी ताजी भाजी उपलब्ध करीत असतात. ताजी भाजीसह कडधान्ये, चिंच, आंबे, सफेद कांदे, कलिंगडे, आजूबाजूच्या बागायतीमधील विविध फळे पारनाका येथील भाजी विक्रेत्यांकडे उपलब्ध असतात. सकाळचे कोवळे उन सरताच उन्हाळ्यातील कडक सुर्य किरणे डोक्यावर पडताच असह्य होते. अशा परिस्थितीत भाजी, फळे, कडधान्य आदीवा व्यवसाय साधणे फार जिकीरीचे बनते. पंचक्रोशीतून भाजी खरेदीसाठी ग्राहक येत असतात. त्यांना सुध्दा उन्हाचा त्रास सहन करत भाजी खरेदी करावी लागते.

रेवदंडा शहरात अनेक वर्ष भाजी मार्केट सुविधा नाही, त्यामुळे भाजी विक्रेत्यासह खरेदीदारांना सुध्दा उन्हाळ्यात व पावसाळ्यात त्रास सहन करावा लागत आहे. भाजी मार्केटप्रमाणे मच्छी मार्केटचा सुध्दा प्रश्न निर्माण झाला आहे. रेवदंडा हायस्कुलच्या बाजूच्या गल्लीत रस्त्यावर तसेच आत गल्लीत मच्छी विक्री व्यवसाय केला जात आहे. या ठिकाणी नित्याने बाहेरील वाहनांची कोंडी होते. रेवदंड्यातील भाजी व मच्छी मार्केट हे जिव्हाळ्याचे प्रश्न केव्हा सुटणार, असा प्रश्न पंचक्रोशीतील ग्रामस्थ करत आहेत.

## द्रोणागिरीत पालखीचा जल्लोष

**उरण** : द्रोणागिरी मातेच्या यात्रेचा जल्लोष यंदा गुरुवार (दि. ९) एप्रिल रोजी उसळणार आहे. शुक्रवारी (दि. १०) एप्रिलला पालखी सोहळ्याचा थरार गावभर धडकी भरवणार आहे. झेंड्यांचा फडफडाट, जय द्रोणागिरी मातेचा कर्णकर्कश गजर करंजा गाव अक्षरशः हादरून जाते. द्रोणागिरी टेकडीवर वसलेलं हे मंदिर म्हणजे इतिहास जपणारा द्रोणागिरी किल्ला आजही या भूमीच्या वैभवाची साक्ष देतो. कोळी बांधवांची अढळ श्रद्धा आणि ग्रामस्थांची निष्ठा या यात्रेला वेगळंच उंची देतात.

# निवडक

## नागोठण्यात हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

**नागोठणे** : नागोठण्यातील हजरत मीरा मोहिद्दीन शाह बाबांचा १९४ वा उरूस शरीफ ५ व ६ एप्रिल रोजी उत्साहात संपन्न झाला. हिंदू- मुस्लिम ऐक्यासाठी संपूर्ण रायगड जिल्ह्यात प्रसिद्ध असलेल्या या उरूसमध्ये मुस्लिम बांधवांसह अनेक हिंदू बांधवांनी दर्ग्यात येऊन दर्शन घेतले. या उरूसच्या पहिल्या दिवशी सायंकाळी मोहल्ल्यातून दर्ग्यापर्यंत संदल मिरवणूक काढण्यात आली. पहिल्या दिवशी उरूस मध्ये नागोठणे शहरासह परिसरातील नागरिकांसह जिल्ह्यातील मुस्लिम बांधव सहभागी झाले होते. या दोन दिवसांच्या उरूसमध्ये थाटलेल्या विविध प्रकारच्या दुकानांतून तसेच इतर खेळाच्या साहित्याचे व्यवसायातून लाखो रुपयांची उलाढाल झाली. हजरत मीरा मोहिद्दीन शाह बाबांच्या उरुसाच्या निमिताने दर्गा व परिसरात मोठ्या प्रमाणात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. विविध खाद्य पदार्थांची दुकाने, सुकविलेली मासळी, औषधी असलेला सफेद कांदा, खेळण्याची दुकाने, शो केस मध्ये ठेवल्या जाणाऱ्या वस्तू यांसह घरात लागणाऱ्या गरजेच्या सर्व वस्तू उरूस मध्ये स्वस्त व वाजवी दरात मिळत असल्याने आदिवासी बांधवांपासून, गरीब, मध्यमवर्गीय ते श्रीमंत व्यक्तीपर्यंत सर्वच जण या उरूसमध्ये खरेदीसाठी येत असतात. त्यामुळे दर्गा परिसर दोन दिवस गर्दीने फुलून गेला होता. नागोठण्यातील हा दोन दिवसांचा उरूस शांततेत व उत्साही वातावरणात यशस्वी होण्यासाठी नागोठणे उरूस कमिटीचे अध्यक्ष काजिम पानसरे, उपाध्यक्ष दानिश इलामी, खजिनदार इम्रान मुल्ला, सचिव मुजफ्फर कडवेकर, सहसचिव अरबाज फामे आदींसह उरूस कमिटीच्या सर्व पदाधिकारी व सदस्यांनी मेहनत घेतली. दोन दिवसांच्या उरूस दरम्यान नागोठणे पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी सचिन कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली नागोठणे पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता.

## बी.फार्मसी परीक्षांचे निकाल जाहीर

**माणगाव** : डॉ. बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ बाटू लोणेरे यांनी बी.फार्मसी अभ्यासक्रमाच्या नियमित रेगुलर तसेच पूरक सप्लीमेंट्री हिवाळी २०२५ परीक्षांचे निकाल जाहीर केले आहेत. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये समाधान व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी मार्ग मोकळा झाला आहे. विद्यार्थ्यांना आपले निकाल संबंधित महाविद्यालयांच्या माध्यमातून ऑनलाइन पद्धतीने पाहता येणार आहेत. तसेच, निकालाचे सविस्तर लेजर संबंधित संस्थांच्या लॉगिनमध्ये उपलब्ध करून देण्यात आले असल्याची माहिती विद्यापीठ प्रशासनाकडून देण्यात आली आहे. यंदाच्या निकालामध्ये नियमित विद्यार्थ्यां सोबतच पूरक परीक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांचाही समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे अपयशी ठरलेल्या विद्यार्थ्यांना पुन्हा संधी मिळून त्यांच्या शैक्षणिक प्रगतीला चालना मिळाली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर अनेक विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केले असून, पुढील शैक्षणिक टप्प्यांसाठी जसे की, पुढील वर्षात प्रवेश, इंटर्नशिप किंवा उच्च शिक्षण या साठी आता तयारीला सुरुवात केली आहे. दरम्यान, निकालामध्ये कोणतीही त्रुटी किंवा शंका आढळल्यास विद्यार्थ्यांनी तात्काळ आपल्या संबंधित महाविद्यालयाशी किंवा विद्यापीठाच्या परीक्षा विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन विद्यापीठ प्रशासनाने केले आहे.

## खुरावले फाटा येथे स्पीड ब्रेकरची मागणी

**पाली-वाघोशी** : पाली-खोपोली रस्त्यावर खुरावले फाटा येथे वारंवार होत असलेल्या अपघातांच्या पार्श्वभूमीवर बहुजन विद्यार्थी संघटनेतर्फे स्पीड ब्रेकर बसविण्याची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात कार्यकारी अभियंता, एमएसआरडीसी, रायगड विभाग तसेच तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, एमएसआरडीसीमार्फत शेकडो कोटी रुपये खर्च करून तयार करण्यात आलेल्या या रस्त्यावर सध्या अपघातांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढत आहे. विशेषतः खुरावले फाटा हा अपघातप्रवण ठिकाण बनला असून, येथे वारंवार अपघात घडत असल्याने स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याबाबत संबंधित अधिकाऱ्यांशी अनेक वेळा संपर्क साधूनही कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. दरम्यान, या मागणीची तातडीने दखल न घेतल्यास बहुजन विद्यार्थी संघटनेच्या माध्यमातून तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही देण्यात आला आहे. सदर निवेदन देताना जिल्हाध्यक्ष अमित बाळू गायकवाड यांच्यासह रमेश जाधव, राहुल कांबळे, नितीन यादव, किसन धायगुडे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.



## खारघरच्या अंबामाता मंदिरात चोरी

**पनवेल** : खारघर उपनगरातील सेक्टर ५ मधील अंबामाता मंदिरात चोरीची घटना घडली. चोराने दानपेटीतील रोख रक्कम व चांदीचे दागिने असा सुमारे ४४ हजार रुपयांचा मुद्देमाल लंपास केला. मंदिर प्रशासनाने खारघर पोलीस ठाण्यात दिलेल्या तक्रारीनुसार, मंदिराच्या कुंपणावरून आत शिरून चोराने प्रथम मंदिरातील पुजाऱ्यांच्या राहत्या खोलीचे दार बाहेरून कपड्याने बांधून त्यांना अडवले. त्यानंतर गाभाऱ्याच्य खिडकीचे लोखंडी गज वाकवून आत प्रवेश करत चोरी केली. या प्रकरणी खारघर पोलिसांनी गुन्हा दाखल करून परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तपास सुरू केला आहे.


## क्लासिफाईड
### जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी

- **झिराड आणि मांडवा येथील** दुकानात पीकअप आशयर व ४०७ वर ड्रायवर हवे आहेत. संपर्क - ८००७८९३२३२
- **बागायती वाडी विक्री १३ गुंठे** (घर, नारळ, सुपारी, विहीर) @२२ लाख पर गुंठा समुद्रापासून २०० मीटर मालक- सुहास माळी गाव- थळ गुंजाळ आळी, अलिबाग. रिसॉर्टसाठी योग्य जागा. मो. ८७७९८०५३५३
- **अलिबाग तालुक्यातील कुर्डूस** हद्दीमध्ये पोयनाड नागोठणे रस्त्यालगत आंबा, नारळ, चिकूची, झाडे असलेली १ एकर जागा विकणे आहे. लाईट, पाणी, रस्ता उपलब्ध मो.९२८४५०६०४१
- **फर्निचर वर्कशॉपमध्ये कामाला** मुले पाहिजेत १२/१५ वी पास, १५००० महिना, ठिकाण- बामणसुरे संपर्क -९८२३५८५३२१
- **उजाला ज्योतिष व इंग्लिश स्पीकिंग** क्लास, कायदेशीर सल्लागार, डोंबिवली, श्रीवर्धन- ९३२४९८७०५०
- **बोअरवेल/विहिरीसाठी इलेक्ट्रॉनिक मशीनद्वारे** भूजल संशोधन व केमिकल ट्रीटमेंट द्वारा जुन्या बोअरवेलचे पाणी वाढवणे. ९२२६७६६१२९/९७६५४६५६६६

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१

# विजयशेठ चॅरिटेबल ट्रस्टतर्फे नेत्र तपासणी

**। माणगाव । प्रतिनिधी ।**

माणगाव शहरात शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल व माणगाव तालुक्यातील विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगावतर्फे बुधवारी (दि.८) एप्रिल रोजी मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन महेंद्र पितांबर मेथा यांच्या प्रशस्त जागेत हॉलमध्ये जुने एसटी स्टॅन्ड जवळ माणगाव करण्यात आले होते. या शिबिरात शंकरा आय हॉस्पिटलचे नेत्ररोग तज्ज्ञ डॉ. प्रकाश पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी नवीन ५५ रुग्णांची तपासणी करून १४ नेत्ररुग्णांना पनवेल येथे नेऊन त्यांच्यावर मोफत यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली आहे. शिबीर हे दर महिन्याच्या पहिल्या किंवा दुसऱ्या बुधवारी आयोजित केले जाते. शिबिराला सचिन शरद देसाई, अरविंद दोशी, अशोक धारिया, महेंद्र मेथा, ज्योती मेथा, तेजल मेथा यांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या. या शिबिरात आतापर्यंत ३२१४ हुन अधिक नेत्ररुग्णांवर यशस्वी मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आलेले आहेत. शिबीर यशस्वी करण्यासाठी विजय मेथा, सुप्रिया शिंदे, तनुजा मेथा, छाया मेथा, विधिता मेथा, मनीष मेथा डॉ.प्रकाश पाटील, डॉ.श्रुती मोहन, सोनाली पाटील, प्रतीक्षा माने, कल्पेश सावंत यांनी परिश्रम घेतले.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी. **- मुख्य संपादक**

---

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ**
**(महाराष्ट्र शासन अंगिकृत)**
**जाहीर नोटीस**

सर्व संबंधित नागरिकांना या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, पेण अलिबाग प्रादेशिक पाणी पुरवठा योजना अंतर्गत पोयनाड येथील १२० एमएलडी जलशुध्दीकरण केंद्र व नागोठणे येथील जॅकवेल विस्तार कामांसाठी आवश्यक असलेल्या बांधकामांमुळे खालीलप्रमाणे झाडे प्रस्तावित कामांच्या क्षेत्रात येत असुन त्यांची तोड प्रस्तावित आहे. सविस्तर माहिती खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | नाव व भूखंड क्र. | एकूण वृक्ष संख्या | वृक्ष कापण्यासाठी परवानगी मागितलेली संख्या | करण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| १. | अशुध्द जल उदंचन केंद्र नागोठणे | २१ | १. वृक्ष कापणे व त्यांची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.<br>अशोका - ०४<br>सुभाबळ - ०५<br>निलगिरी - ०१<br>उंबर - ०१<br>जांभूळ - ०१<br>भेंडी - ०२<br>करंज - ०१<br>जंगली वृक्ष - ०६<br>एकूण - २१ | बांधकामास अडथळा निर्माण होत असल्यामुळे झाडे कापणेसाठी प्रस्तावित. |
| २ | जलशुध्दीकरण केंद्र पोयनाड | ३२ | २. वृक्ष कापणे व त्यांची तपशीलवार माहिती पुढीलप्रमाणे आहे.<br>अकेशिया - ०२<br>अंजन - ०१<br>वड - ०१<br>जांभूळ - ०२<br>आंबा - २३<br>निलगिरी - ०१<br>सावर - ०२<br>एकूण - ३२ | बांधकामास अडथळा निर्माण होत असल्यामुळे झाडे कापणेसाठी प्रस्तावित |

तरी Maharashtra (Urban Areas) Protection and Preservation of Trees Act १९७५ कलम ८ (३) (a) नुसार सदर वृक्ष कापणेसाठी (Feeling) कसल्याही प्रकारची हरकत असल्यास तसे त्यांनी आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ८ दिवसाच्या आत नमूद केलेल्या पत्त्यावर लेखी कळवावे, तसे कोणी न कळल्यास मागणीप्रमाणे वृक्ष कापणेसाठी (Feeling) व वृक्ष संवर्धन करण्यासाठी परवानगी दिली जाईल. नंतर कोणाची व कसलीही तक्रार ग्राह्य घेण्यात येणार नाही, म्हणून उपविभाग अलिबाग तर्फे जाहीर नोटीस दिली आहे.

कार्यालयाचा पत्ता:- उप अभियंता व स्विय सहा.क्र. १,
मऔविम, उपविभाग अलिबाग,
रेवस रोड, ता. अलिबाग
जि. रायगड - ४०२२०१
फोन नं. ०२१४१ २२२२५७

**सही/-**
**वृक्ष अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,**
**मऔविम विभाग अलिबाग**

---

दिनांक ०८/०४/२०२६

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे मढाळी ता. सुधागड जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :-**
**मौजे - मढाळी ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट नं./स. नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.सहदेव रघुनाथ साजेकर | १५/२ | ०-२२-५० | २-१९ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी-विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतीचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहीवाट, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत १५ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे. असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक ०८/०४/२०२६

सही /-
**श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर**
ॲडव्होकेट
पो. नवीन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मो.बा.नं.८१४९६५१५०८

---

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांच्या सुचनेवरून आम्ही मौजे पोयनाड, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींचे विद्यमान मालक १. प्रविण गिरीधर टेमकर, २. उमेश गिरीधर टेमकर, ३. सिमा जनार्दन म्हात्रे, ४. अजय गिरीधर टेमकर, ५. प्रिती प्रदिप टेमकर, ६. निकीत प्रदिप टेमकर व ७. संकेत प्रदिप टेमकर यांच्या मालकी हक्कांचे निर्वेधतेची पडताळणी करीत आहोत. परिशिष्टात नमूद केलेल्या मिळकतींच्या मालकांनी असे निवेदीत केले आहे की, खाली नमूद परिशिष्टात वर्णन केलेल्या मिळकतींमध्ये त्यांस पुर्णपणे व निर्वेध मालकीहक्क आहेत.

तरी ज्या इसमांचा त्या मिळकतींमध्ये अथवा त्यांतील कोणत्याही भागावर अथवा भागामध्ये करार, संमतीज्ञापन, भागीदारी, खरेदी, भाडेपट्टा, पोटभाडेपट्टा, वारसा, बोजा, दान, गहाण, हस्तांतरण, अदलाबदल, विश्वस्त, कुळवहिवाट, ताबा, परवाना, वहिवाट, कसवणुक, पोटगी, मृत्यूपत्र, कौटुंबिक व्यवस्था, तडजोड, कोर्टाचा हुकुमनामा, वहिवाटीच्या रस्त्याचा करार या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असेल, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यांसहित रजिस्टर्ड पोस्ट ओ.डी. द्वारे लेखी कळवावे. मुदतीत तसे कुणीही न कळविल्यास, सदर मिळकतींमध्ये कुणाचाही कोणताही हक्कहितसंबंध नाही अथवा असल्यास तो कायमस्वरूपी सोडून देण्यात आला आहे, असे समजण्यात येईल व नोटीस मुदतीनंतर आलेली कोणतीही तक्रार, हरकत अथवा दावा विचारात घेतला जाणार नाही. तसेच मिळकतींचे विद्यमान मालकांचे मालकी हक्क निर्वेध व निजोखमी आहेत असे गृहित धरून आमचे अशिल नियोजित खरेदी व्यवहार पुर्ण करतील.

**परिशिष्ट**
**ता. अलिबाग, जि. रायगड येथील**

| मौजे | स.नं./हि.नं. | क्षेत्र हे. आर. चौ. मी. | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| पोयनाड, | १५३/३ | १-८२-००<br>पो.ख. ०-११-००<br>१-९३-०० | ३.३२ |
| पोयनाड, | १५४/२ | ०-११-१०<br>पो.ख. ०-००-८०<br>०-११-९० | ३.१२ |
| पोयनाड, | १६४/४ | ०-१५-४०<br>पो.ख. ०-०१-८०<br>०-१७-२० | ४.३१ |
| पोयनाड, | १६४/५ | ०-६५-५०<br>पो.ख.०-०५-३०<br>०-७०-८० | १६.३१ |
| पोयनाड, | १६४/६ | १-०५-७०<br>पो.ख.०-०८-६०<br>१-१४-३० | ३०.३७ |
| पोयनाड, | १६५/२ | ०-३५-७०<br>पो.ख. ०-०४-३०<br>०-४०-०० | ०७.०६ |
| पोयनाड, | १६२/१ | ०-०७-०० | ००.२८ |

तसेच त्यामध्ये असलेली ग्रुप ग्रामपंचायत पोयनाड, घर नं. ६५७ ही घर मिळकत.

अलिबाग
तारीख : ९/४/२०२६

सही/-
**ॲड. गणेश गोविंद पाटील**
ए/१,२, तळमजला,
'श्रुतीसारंग' को. ऑप. हा. सोसायटी,
युनियन बँकेसमोर, ब्राह्मणआळी,
अलिबाग, रायगड, ४०२ २०१.

---

**कोंकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड**
**(भारत सरकारचा उपक्रम)**
**ई-निविदा सूचना**

कोकण रेल्वे कॉर्पोरेशन लिमिटेड तर्फे, क्षेत्रीय विद्युत अभियंता, केआरसीएल, रत्नागिरी यांनी पुढील कामासाठी ई-ओपन टेंडरची आमंत्रणे दिलेली आहेत. **कामाचे नाव** – महाराष्ट्र राज्यातील कोकण रेल्वे मार्गावरील रत्नागिरी विभागात रोहा ते मडुरे या विद्युतिकृत विभागांमध्ये पीडब्ल्यूएवाय कामांसाठी सहाय्य करण्याकरिता टेक्नीशियन (इलेक्ट्रिकल) पदासाठी मनुष्यबळ एक वर्षासाठी भाड्याने घेणे. **टेंडर क्रमांक : केआर/आरएन/ईएल/टी/2/2026 दिनांक 09/04/2026, अंदाजित खर्च** – ₹ 31,36,860/- (जीएसटी वगळून), **टेंडर फॉर्म शुल्क** – नाही, **ईएमडी** – ₹ 62,700/- (किंवा आयआरईपीएस पोर्टलवर दर्शविल्याप्रमाणे) **टेंडर ऑनलाइन सादर करण्याची शेवटची तारीख व वेळ :** 30/04/2026 दुपारी 15:00 वाजेपर्यंत. अधिक माहितीसाठी वरिष्ठ क्षेत्रीय विद्युत अभियंता, एमआयडीसी परिसर, मिरजोळे, रत्नागिरी यांच्या कार्यालयाशी अथवा रेल्वे संकेतस्थळावर (www.ireps.gov.in) संपर्क साधावा.


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने नविन डिझाइन्स



**मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.**

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


---

**जाहीर नोटीस**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी मौजे नागांव, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील क्षेत्राची वर्णनाची बागायत जमिन मिळकत त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) सुरेश अनंत पाटील मयत त्यांना वारस १/१) संकल्प सुरेश पाटील, १/२) स्नेहल सुरेश पाटील १/३) श्वेता विकास फुलारे १/४) नयना राकेश पाटील, २) नरेश अनंत पाटील मयत त्यांना वारस २/१) मंजिरी नरेश पाटील २/२) वंदना नरेश पाटील, ३) रमेश अनंत पाटील मयत त्यांना वारस ३/१) मानसी रमेश पाटील ३/२) रचना रमेश पाटील यांचे कडुन त्यांचा असणारा हिस्सा कायम मालकी हक्काने विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रू.पै) |
|---|---|---|---|
| नागांव ता.अलिबाग | १६४९ | ००-३१-८० बागायत<br>००-०३-७० पो.ख.<br>००-३५-५० एकुण | ०८.६१ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीमध्ये १) सुरेश अनंत पाटील मयत त्यांना वारस १/१) संकल्प सुरेश पाटील, १/२) स्नेहल सुरेश पाटील १/३) श्वेता विकास फुलारे १/४) नयना राकेश पाटील, २) नरेश अनंत पाटील मयत त्यांना वारस २/१) मंजिरी नरेश पाटील, २/२) वंदना नरेश पाटील, ३) रमेश अनंत पाटील मयत त्यांना वारस ३/१) मानसी रमेश पाटील, ३/२) रचना रमेश पाटील यांच्या नावे असलेले क्षेत्र ००-१६-३० हे. आर., आकार ४.४१ पैसे या नोटीसीचा विषय आहे.

सदरची मिळकत ही त्यांचे निर्वेध मालकी हक्काची व प्रत्यक्ष तावेकब्ना वहिवाटीतील असून, ती विकणेचा त्यांस हक्क अधिकार असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. मात्र तरी देखील वर वर्णन केलेल्या मिळकतीवर अथवा तिचे कोणत्याही भागावर, कुणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, लिज, लिएन, चार्ज, पोटगी, ताबा, वहिवाट, इजमेंटरी हक्क या अथवा अन्य कोणत्याही तऱ्हेने सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांच्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ (पंधरा) दिवसांचे आत खाली दिलेल्या आमचे पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यासहीत लेखी स्वरूपात आणून देण्यात यावे. मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची तक्रार अथवा हरकत न आल्यास सदरची मिळकत विद्यमान मालकांच्या निर्वेध व निजोखमी मालकी हक्काची आहे व तिचेवर अन्य कुणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही अथवा तसा हक्क असुनही तो त्यांनी विद्यमान मालकांच्या तसेच आमच्या अशिलांच्या लाभांत सोडुन दिला आहे, असे गृहित धरून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेली कुणाचीही तक्रार अगर हरकत विचारात घेतली जाणार नाही, हे सर्वांस कळावे

ठिकाण- अलिबाग
दिनांक ०८/०४/२०२६

**ॲड. राहुल रमेश नाईक**
मु.पो.नागांव, ता.अलिबाग,
जि. रायगड मोबा.
क्र.९९२२७९८५२८

---

**जाहीर नोटीस**

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, आमच्या अशिलांनी खाली वर्णन केलेल्या मिळकती त्या मिळकतीचे विद्यमान मालक १) श्रीमती वसुधा विजय घरत २) सौ. साधना विलास वर्तक ३) सौ. सुजाता सचिन घरत सर्व रा. पालव, पो. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांचेकडून विकत घेणेचे ठरलेले आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा विद्यमान मालकांनी दिल्यावरून आमच्या अशिलांनी सदरचा व्यवहार ठरविलेला आहे.

**-: मिळकतीचे वर्णन :-**

| मौजे | भुमापन क्र. व उपविभाग नं. | क्षेत्र (आर.चौ.मी.) | आकार (रू.पैसे) |
|---|---|---|---|
| मौजे बागमळा, ता.अलिबाग | ४२ | ०-१६-२ | ०-२५ |
| चौल उत्तरभाग, ता.अलिबाग | ६३१ | ०-३१-० | ०-५५ |

सदर मिळकतीबाबत अन्य कोणाचा कसलाही हक्क, हितसंबंध बोजा, अथवा गहाण, दान लिज, पोटगी, हवाला, साठेकरार, खरेदी, मेन्टेनन्स् मेहेर, कर्ज वगैरेबाबत कसलाही हक्क हितसंबंध अथवा हरकत असल्यास अशा व्यक्तींनी सदर हरकतीबाबत त्या हरकती संबंधीच्या लेखी कागदोपत्री पुराव्यासह आपली हरकत खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून (१४) चौदा दिवसांचे आत आणून द्यावी. याप्रकारे ठरलेल्या मुदतीत कोणाचीही कोणत्याही प्रकारची कसलीही हरकत आली नाही तर सदर मिळकत निर्वेध आहे व या मिळकतीबाबत क्लिअर व मार्केटेबल टायटल आहे, असे समजून माझे अशील सदर व्यवहार पूर्ण करतील व यानंतर कोणाचीही कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही व आमच्या अशिलांस सदर मिळकतीचा नंतर निर्वेध असल्याचा दाखला देण्यांत येईल हे सर्वास कळावे.

अलिबाग,
दि. ८-०४-२०२६.

सही/-
**ॲड. आर. बी. कोसमकर**
चिरायु, ब्राम्हण आळी, अलिबाग
ता.अलिबाग, जि.रायगड.

---

माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटीचे
**ना. म. जोशी विद्याभवन**
मु.पो. गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड - ४०२१०३
निविदा सूचना (Tender Notice)

यांच्या वतीने खालील नमूद केलेल्या कामासाठी पात्र व अनुभवी कंत्राटदारांकडून सीलबंद निविदा मागविण्यात येत आहेत. कंत्राटदारांनी प्रत्यक्ष कामाच्या ठिकाणी भेट देऊन, काम समजून घेऊन निविदा सादर कराव्यात.
कामाचे नाव : खेळाच्या मैदानाभोवती कंपाऊंड वॉल बांधणे.
कामाचे स्वरुप : खेळाच्या मैदानाभोवती मजबूत व सुरक्षित कंपाऊंड वॉल (भिंत) बांधणेसाठी आवश्यक ते साहित्य, मजुरी व इतर कामांसह पूर्ण करणे. अंदाजित खर्च : ₹८,००,०००/-
निविदा अर्ज उपलब्धता : दिनांक १३/४/२०२६ ते १५/४/२०२६ वा कालावधीत शाळेच्या कार्यालयात व कार्यालयीन वेळेत उपलब्ध राहील.
निविदा स्वीकारण्याची अंतिम तारीख : दिनांक १६/४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजेपर्यंत
निविदा उघडण्याची तारीख : दिनांक २०/४/२०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता (संबंधित कंत्राटदारांच्या उपस्थितीत)
अटी व शर्ती :
१. कंत्राटदाराकडे संबंधित कामाचा अनुभव असावा.
२. आवश्यक परवाने व नोंदणी प्रमाणपत्रे सादर करणे बंधनकारक आहे.
३. कोणतीही निविदा स्वीकारण्याचा वा नाकारण्याचा अधिकार संस्थेने राखून ठेवला आहे.
४. अपूर्ण किंवा उशीरा आलेल्या निविदांचा विचार केला जाणार नाही.
५. इतर अटी व शर्ती निविदा अर्जामध्ये नमूद केलेल्या आहेत.

अधिक माहितीसाठी संपर्क साधा.
फोन नं. ९९७५८९५९६०
Email: nmjvbgoregaon@rediffmail.com

दिनांक : ९-४-२०२६
ठिकाण : गोरेगांव-रायगड

**चेअरमन/सचिव**
माणगांव तालुका एज्युकेशन सोसायटी,
गोरेगांव, ता. माणगांव, जि. रायगड

---

**RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG**
**(From Z)**

Sub: Rule1 (d-1) of rule 107 of MCS Rules 1961
Passession Notice For Immovable Property

Whereas the undersigned being the recovery officer of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST- RAIGAD Under the maharastra Co-op Society Rule 1961 Issued demand notice date 04/06/2021 calling upon the judgment debtor Shri. Yusuf Mahmood Arjbegi At. Aagardanda Post. Aagardanda Tal. Murud Dist- Raigad to repay the amount mentioned in then notice being Rs. 3415384/- (Rs. Thirty four lakh fifteen thousand three hundred eighty four only) with interest within 15 day from the receipt of the said notice and the judgement debtor failed to repay the undersigned had issued a notice or attachment dated 15/03/2023 and attached the property described herein below.

The judgement debtor having failed to repay the amount notice is hereby given on the judgement debtor and the public in general that the undersigned has decided to tak passession of the property deseribed here below in exereise of powers confereed on him under rule 107 (11) (d-1) of the Maharastra Co-op Society Rules 1961.

The judgement debtor particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property described herein and any dealings with the said property will be subject to the change of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST-RAIGAD For an amount of Rs. 2707535/- (Rs. Twenty seven lakh seven thousand five hundred thrity five only) and 01/01/2022 interest thereon.

Descriptio of the Immovable Property

| | | |
|---|---|---|
| Aagardanda Gat no. 91 | Siraj mohmood arjbegi | Area -0.61.00 HR |
| Aagardanda House No. 125 | Yusuf faki mohmood arjbegi Naznam Yusuf arjbegi | Area-2880.00 ft |

The Z Notice is given to the borrower and gurantor by Register post on date -09/04/2026 With signature and office stamp.

Recovery Officer
**RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG**

---

**RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG**
**(From Z)**

Sub: Rule1 (d-1) of rule 107 of MCS Rules 1961
Passession Notice For Immovable Property

Whereas the undersigned being the recovery officer of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST- RAIGAD Under the maharastra Co-op Society Rule 1961 Issued demand notice date 26/02/2025 calling upon the judgment debtor Shri. Nitin Gajanan Warge At. Undargaon Post. Shighre Tal. Murud Dist- Raigad to repay the amount mentioned in then notice being Rs. 652511/- (Rs. Six lakh fifty two thousand five hundred and eleven Rs. only) with interest within 15 day from the receipt of the said notice and the judgement debtor failed to repay the undersigned had issued a notice or attachment dated 19/12/2025 and attached the property described herein below.

The judgement debtor having failed to repay the amount notice is hereby given on the judgement debtor and the public in general that the undersigned has decided to take passession of the property deseribed here below in exereise of powers confereed on him under rule 107 (11) (d-1) of the Maharastra Co-op Society Rules 1961.

The judgement debtor particular and the public in general is hereby cautioned not to deal with the property described herein and any dealings with the said property will be subject to the change of RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG DIST-RAIGAD For an amount of Rs. 645086/- (Rs. Six lakh forty five thousand and eighty six Rs. only) and 01/12/2024 interest thereon.

Descriptio of the Immovable Property

| | | |
|---|---|---|
| Tisale Gat no.36 | Gajanan Mahadev Warge | Area-0.13.90 HR |
| Undargoan House No. 40 | Gajanan Mahadev Warge | Area-380 sq. ft |

The Z Notice is given to the borrower and gurantor by Register post on date -09/04/2026
With signature and office stamp.

Recovery Officer
**RAIGAD DISTRICT CENTRAL CO-OPERATIVE BANK LTD ALIBAG**

---

## दक्षिण कळंब पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड

**सूचना**
**(विद्युत कायदा 2003 च्या कलम 15 चे उपकलम (2) अन्वये)**

1. **दक्षिण कळंब पॉवर ट्रान्समिशन लिमिटेड,** ज्याचे नोंदणीकृत कार्यालय **सी–105, आनंद निकेतन, नवी दिल्ली– 110021** येथे आहे आणि कंपनी कायदा, 2013 च्या अंतर्गत संस्थापित आहे, त्याने केंद्रीय विद्युत नियामक आयोग, नवी दिल्ली यांच्याकडे विद्युत कायदा, 2003 च्या कलम 15 च्या उप–कलम (1) अंतर्गत खाली दिलेल्या तपशिलांनुसार ट्रान्समिशन लाईन्स, सब–स्टेशन्स आणि इतर मालमत्तेच्या संदर्भात ट्रान्समिशन परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज केला आहे.

| अनु. क्र | लाईन/सब–स्टेशनचे नाव (स्थान) | लाईनची लांबी/क्षमता | काम पूर्ण करण्याचा अंदाजे खर्च किंवा लेव्हलाइज्ड ट्रान्समिशन शुल्क | सीओडी कालावधी | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| 1. | नवीन 765 केव्ही बस सेक्शन–।। आणि ।।। तसेच 400 केव्ही बस सेक्शन–।। आणि ।।। ची निर्मिती, 765 केव्ही सेक्शनलायझेशन बे: 2 संच आणि 400 केव्ही सेक्शनलायझेशन बे: 2 संच आणि दक्षिण कळंब उपकेंद्र येथे 3x1500 एमव्हीए, 765/400 केव्ही आयसीटीचे इंस्टॉलेशन (400 केव्ही सेक्शन–।।। आणि 765 केव्ही सेक्शन–।।। साठी) यासह आणि सेक्शन–।।। वर 2x330 एमव्हीएआर, 765 केव्ही बस रिऍक्टर आणि 2x125 एमव्हीएआर, 420 केव्ही बस रिॲक्टर उभारणी | 765/400 केव्ही | रु. 1201.36 दशलक्ष कोटी | 30.03.2028 | |
| 2. | नागोठणे–पडघे 400 केव्ही डी/सी लाईनचे लिलो दक्षिण कळंब येथे, क्वाड ACSR/AAAC/AL59 मूस समतुल्य कंडक्टरसह | 10 किमी | | | |
| 3. | पुणे (एआयएस)–नवी मुंबई 400 केव्ही लाईनचे लिलो दक्षिण कळंब येथे, क्वाड ACSR/AAAC/AL59 मूस समतुल्य कंडक्टरसह | 10 किमी | | | |
| 4. | पुणे (एआयएस)–विक्रोळी 400 केव्ही लाईनचे लिलो दक्षिण कळंब येथे, क्वाड ACSR/AAAC/AL59 मूस समतुल्य कंडक्टरसह | 10 किमी | | | |
| 5. | क्रमांक 2, 3 आणि 4 मधील लिलो लाईन्ससाठी दक्षिण कळंब उपकेंद्र येथे 400 केव्ही चे 8 बे | 400 | | | |

2. आयोगाकडे दाखल केलेला संपूर्ण अर्ज आणि इतर दस्तऐवज हे कोणत्याही व्यक्तीकडून पहाणीसाठी वेबसाईट www.adanienergysolutions.com वर उपलब्ध आहेत. ह्या अर्जाची तपासणी आयोगाने नमूद केलेल्या कार्यपध्दती अनुसार **12वा मजला, साऊथ विंग, केपी एपिटोम, मकरबा, अहमदाबाद–380051** येथील कंपनीच्या कार्यालयात **प्रशांत कुमार** यांच्याकडे अथवा आयोगाच्या कार्यालयात करता येऊ शकेल.

3. कोणत्याही हरकती अथवा सूचना असल्यास, त्या वर्तमानपत्रात ही सूचना प्रसिध्द झाल्यापासून 15 दिवसाच्या आत सेक्रेटरी, केन्द्रिय विद्युत नियामक आयोग, **6वा, 7वा आणि 8वा मजला, टॉवर बी, वर्ल्ड ट्रेड सेंटर, नौरोजी नगर, नवी दिल्ली– 110029** यांच्याकडे पाठवून द्याव्यात आणि सदर हरकती/सूचना यांची प्रत अर्जदार किंवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी यांच्याकडे पाठवून द्यावी.

स्थळ: अहमदाबाद
दिनांक: 09.04.2026

**प्रशांत कुमार**
प्रमुख – नियामक व वाणिज्य

विनायक दळवी

# टी-२० प्रथम श्रेणी क्रिकेटच्या मुळावर

पाकिस्तानचा माजी कर्णधार इमरान खान, जो क्रिकेट विश्वात धूर्त कर्णधार म्हणून देखील ओळखला जात होता. त्याने काही वर्षांपूर्वी भारतात एका समारंभात सांगितले होते की, २० शषटकांचे क्रिकेट हे खरं तर जिथे क्रिकेट हा खेळ आयसीसीला रुजवायचा आहे तेथे अधिक प्रमाणात खेळला गेला पाहिजे. मात्र, सध्या उलट परिस्थिती पाहायला मिळते. भारतासारख्या देशात क्रिकेट हा धर्म



मानला जातो, तिथे २० षटकांच्या क्रिकेट स्पर्धांचे पेवच फुटले आहेत, असे वाटते. भरपूर स्पर्धा या प्रकारच्या क्रिकेटच्या होतात. त्याचा परिणाम असा झाला की, कसोटी क्रिकेट किंवा प्रथम दर्जाचे क्रिकेट भारतात मरत चाललंय. त्याचा परिणाम आपण सध्या पाहतोय. भारत आपल्या देशात देखील कसोटी मालिका सपाटून हरायला लागला आहे. याबाबत उदाहरण देताना इमरान खानने, भारताने न्युझीलँडविरुद्ध त्यावेळी गमावलेल्या ३-० पराभवाच्या मालिकेचे उदाहरण दिले. एखादा कसोटी सामना तरी आपण आपल्या शैलीने, ताकदीवर किंवा क्रिकेटच्या ज्ञानावर अनिर्णित राखू शकतो. त्यासाठी चिकाटी पाहिजे, तंत्र पाहिजे. ते भारतीय खेळाडूंमधून हळूहळू कमी होत चालले आहे, असे स्पष्ट दिसत आहे. इमरानचं म्हणणं होतं की, अमेरिकेसारख्या देशात जिथं क्रिकेट पेक्षा इतर खेळ लोकप्रिय आहेत. तिथं क्रिकेट लोकप्रिय करण्यासाठी अशा २० षटकांच्या किंवा त्यापेक्षा कमी षटकांच्या सामन्यांचा आधार घेतला गेला पाहिजे. या उलट आयसीसी देखील ज्या ज्या देशात या प्रकारच्या क्रिकेटमुळे पैसा अधिक मिळतो त्या त्या देशात अधिकाधिक स्पर्धांचे आयोजन करण्यास परवानगी द्यायला लागली आहे.

अर्थातच याचं मुख्य कारण म्हणजे क्रिकेट लोकप्रिय असलेल्या भारत, पाकिस्तान, श्रीलंका किंवा अन्य देशांमध्ये, अगदी इंग्लंडमध्ये देखील मर्यादित षटकांचे किंवा कमी वेळातील क्रिकेट सामने पाहणे नवी पिढी पसंत करायला लागली आहे. त्यांना चौकार षटकार हवे आहेत. त्यांना एखाद्या संघाने कमी धावसंख्या केली ही गोष्ट फारशी आवडत नाही. त्यांना गोलंदाजाची स्किल किंवा शैली पाहण्यापेक्षा फलंदाजांनी मारलेला षटकार पाहायला अधिक आवडतं. त्याचाच फायदा घेऊन आयोजकांनी सर्व किंवा बहुतेक मैदानाच्या सीमारेषा अधिकाधिक आतमध्ये आणायला सुरुवात केली आहे. अगदी मुंबईच्या वानखेडे स्टेडियम सारख्या प्रमुख कसोटी केंद्रावर देखील आयपीएल स्पर्धेत सीमारेषा काही ठिकाणी ६० यार्डपर्यंत आत आणलेली दिसते. त्यामुळे चौकार किंवा षटकार अगदी सहज नोंदविले जातात.

नुकत्याच संपलेल्या विश्वचषक स्पर्धेत देखील आपण पाहिलं की चौकार षटकारांची नुसती आतिशबाजी होत होती. इंग्लंड विरुद्ध उपांत्य फेरीचा सामना लक्षात घ्या. ४० षटकांत पाचशे धावा फटकावल्या गेल्या. ही गोष्ट नव्या पिढीला आवडते. त्यांना चौकार षटकार आवडतात. उत्तुंग फटके पाहायला आवडतात. मात्र, हे काही वेळा लुटू पुटूचे क्रिकेट वाटतं. फलंदाजांच्या हातातील बॅट देखील अशा तऱ्हेने बनवण्यात आली आहे की, बॅट फिरल्यानंतर मिस्टाईम झालेला फटका देखील षटकार म्हणून सीमारेषेपलीकडे जातो. येथे फलंदाजांचे स्किल पाहता येत नाही. फलंदाजाचे पदलालित्य पाहता येत नाही. केवळ बॅटचा झोका आणि शक्ती यामुळे मारलेले फटके पाहायला मिळतात. हीच फटकेबाजी प्रथम दर्जाच्या क्रिकेट सामन्यात आणि रणजी सामन्यात देखील गायब झालेली पाहायला मिळते. हे फटकेबाज फलंदाज रणजी स्पर्धांमध्ये अर्धशतक गाठताना देखील थकतात. त्यांची दमचाक झालेली पाहायला मिळते. तीच गोष्ट भारतीय क्रिकेट संघाबद्दल बोलता येईल.

तसेच, भारताने परदेशी संघाविरुद्ध भारतात फिरकीच्या पोषक खेळपट्टीवर देखील कसोटी सामने गमावल्याच्या घटना अलीकडे वारंवार होत आहेत. आयपीएल स्पर्धेत खेळपट्टीचा वेग किंचितही कमी झाला तर याच फटकेबाज फलंदाजांना मोठे फटके मारता येत नाहीत आणि त्यामुळे अचानक एकूण धावसंख्या कमी झालेली पाहायला मिळते. २०० धावसंख्येच्या वर फटकावलेली मोठी धावसंख्या देखील, चेंडू वेगात येणाऱ्या खेळपट्टीवर, सुरक्षित किंवा विजयी धावसंख्या वाटत नाही. त्याचे मुख्य कारण म्हणजे खेळाडूंना चेंडू बॅटवर येणारी व चांगली उसळी असणारी खेळपट्टीच आवडते. खेळपट्टीत किंचितही बदल झाला तर त्यांना धावा काढता येत नाहीत. ही वस्तुस्थिती वारंवार पाहायला मिळते. त्यामुळे आयपीएलच्या दोन महिन्यांच्या हंगामात कोणताही खेळाडू धावांचे सातत्य राखत नाही. त्या त्या दिवशी, त्या त्या खेळपट्टीनुसार त्यांचा खेळ बहरत असतो किंवा खराब देखील होत असतो. प्रेक्षकांना अधिक धावा आवडतात. चौकार, षटकार आवडतात. फलंदाजांना देखील पाटा खेळपट्ट्या ज्यांच्यावर सहज चेंडू फटकावता येतो, अशा खेळपट्ट्या आवडतात. त्यामुळे क्रिकेट हा खेळ काही वेळा बेसबॉल प्रमाणे स्विच हिटचा खेळ वाटायला लागतो.

# राजस्थानकडून विजयाची हॅट्ट्रिक साजरी






**। गुवाहाटी । वृत्तसंस्था ।**

राजस्थान रॉयल्सने आयपीएलमधील आपली विजयी घोडदौड कायम राखली आहे. गुवाहाटीच्या खेळपट्टीवर मंगळवारी (दि.७) राजस्थानचा सामना मुंबई इंडियन्स सोबत झाला. पावसामुळे हा सामना ११-११ षटकांचा खेळविण्यात आला. मात्र, राजस्थानने मुंबई समोर तब्बल १५१ धावांचे लक्ष ठेवले होते. परंतु, मुंबई संघाच्या सुमार कामगिरीमुळे राजस्थान रॉयल्सने विजयाची हॅट्ट्रिक साजरी केली.

राजस्थानचे यशस्वी जैसवाल आणि वैभव सुर्यवंशीने पहिल्या चेंडूपासूनच बॅट फिरकवायला सुरूवात केली. यशस्वीने पहिल्याच षटकात मुंबईच्या दीपक चहरला फैलावर घेताना २२ धावा कुटल्या. त्यानंतर वैभवने जसप्रीतचा पहिलाच चेंडू ८८ मीटर लांब भिरकावला. वैभव व यशस्वी जोडीने ५ षटकांत ८० धावा जोडल्या. वैभव १४ चेंडूत १ चौकार व ५ षटकारांसह ३९ धावांवर झेलबाद झाला. ध्रुव जुरेल (२) आणि रियान पराग (२०) यांना अल्ला घझनफरने बाद केले. यशस्वीने ३२ चेंडूंत १० चौकार व ४ षटकारांच्या मदतीने ७७ धावांची नाबाद खेळी केली. त्यामुळे राजस्थानने ११ षटकांत ३ बाद १५० धावांचा डोंगर उभा केला.

त्यानंतर धावांचा पाठलाग करताना मुंबईच्या रायन रिकेल्टने षटकार मारून आक्रमकता दाखवली, परंतु जोफ्रा आर्चरने टाकलेल्या चेंडूने रिकेल्टनचा अवघ्या ८ धावांवर जागच्या जागी उत्तुंग झेल उडाला. सूर्यकुमार यादवही ६ धावांवर नांद्रे बर्गरच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला. त्यानंतर रोहित शर्माही पायचीत झाला आणि मुंबईने २२ धावांत ३ फलंदाज गमावले. हार्दिक पांड्या (९) व तिलक वर्मा (१४) यांच्याकडून खूप अपेक्षा असतानाही दोघेही एकाच षटकात माघारी परतले. शेरफान रदरफर्ड आणि नमन धीर यांनी चांगली फटकेबाजी करून सामन्यात चुरस निर्माण केली होती. परंतु, या दोघांची १७ चेंडूंत ४७ धावांची भागीदारी तुषार देशपांडेने तोडली. रदरफर्ड ८ चेंडूंत २५ धावांवर बाद झाला. नमनही १३ चेंडूत २५ धावांवर बाद झाला. यावेळी मुंबईला ११ षटाकांत ९ बाद १२३ धावाच करता आल्या. त्यामुळे राजस्थानने हा सामना २६ धावांनी जिंकला.

### वैभव सूर्यवंशीची ऐतिहासिक कामगिरी

१५ वर्षीय वैभव सूर्यवंशीने मुंबई विरूद्धच्या सामन्यात ऐतिहासिक कामगिरी केली आहे. त्याने ११-११ षटकांच्या सामन्यात १४ चेंडूत ३९ धावांची वादळी खेळी केली. त्यात १ चौकार व ५ खणखणीत षटकारांचा समावेश होता. तसेच, जगातील सर्वोत्तम गोलंदाज जसप्रीत बुमराहला पहिल्याच चेंडूवर षटकार खेचला. त्याचबरोबर गेल्या आठ वर्षांपासून रिषभ पंत व इशान किशन यांच्या नावावर असलेला विक्रम वैभवने मोडला. या युवा खेळाडूने आपल्या आयपीएल कारकिर्दीत आतापर्तंय एकूण ३५ षटकार मारले आहेत आणि लीगच्या इतिहासातील कोणत्याही किशोरवयीन खेळाडूने मारलेले हे सर्वोत्तम षटकार ठरले आहेत. तसेच, राजस्थानच्या या प्रतिभावान खेळाडूने आयपीएलमध्ये आतापर्यंत ३७४ धावा केल्या आहेत. तसेच, लीगमध्ये १८ वर्षांखालील खेळाडूंमध्ये सर्वोत्तम धावा करणाऱ्यांमध्ये वैभव अव्वल आहे.

# ब्राह्मण प्रीमिअर लीग जल्लोषात



**। कर्जत । प्रतिनिधी ।**

कर्जत तालुका सर्व शाखीय ब्राह्मण सभा आयोजित ब्राह्मण प्रीमिअर लीग येथील गुरुकुल इंटरनॅशनल स्कुलच्या सुसज्ज मैदानावर जल्लोषात पार पडली. या स्पर्धेत केके टायटन्स्, वैद्य वॉरियर्स, एनएम ११, एसए ११, व्हिके विप्रा व कुलकर्णी मंडप या सहा संघांनी सहभाग घेतला होता. स्पर्धेचे उद्घाटन डॉ. उपेंद्र सुगवेकर, चंदन भडसावळे, भालचंद्र जोशी व दीपक बेहेरे, महेश वैद्य, संजीव दातार, विशाल जोशी व ॲड. गायत्री परांजपे यांच्या उपस्थितीत पार पडले. या स्पर्धेत महेश वैद्य यांचा वैद्य वॉरियर्स हा संघ अंतिम विजेता ठरला असून, यश करंदीकर व रोहित कानडे यांचा केके टायटन्स् हा संघ उपविजेता ठरला आहे. स्पर्धेच्या बक्षिस समारंभावेळी परशुराम मंडळाचे संचालक विश्वजित देशपांडे, माजी नगराध्यक्षा सुवर्णा जोशी, निशांत जोशी, भालचंद्र जोशी, गौरी जोशी व प्रदीप गोगटे उपस्थित होते.

# डेव्हिड वॉर्नरला अटक

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

ऑस्ट्रेलियाचा स्टार क्रिकेटपटू डेव्हिड वॉर्नरला ऑस्ट्रेलियामध्ये दारू पिऊन गाडी चालवल्याप्रकरणी अटक करण्यात आली आहे. तो पाकिस्तान सुपर लीग खेळण्यासाठी पाकिस्तानात परतला असला तरी, त्याला लवकरच न्यायालयासमोर हजर व्हावे लागणार आहे. रात्री उशिरा सिडनीच्या मारुब्रा येथे श्वासाच्या चाचणीत अयशस्वी झाल्यानंतर त्याच्या शरीरात मर्यादेपेक्षा जवळपास दुप्पट मद्य असल्याचे आढळून आले.

# अजय कडू ठरला ‘टागोर नगर श्री’



**। मुंबई । प्रतिनिधि ।**

टागोर नगर मित्र मंडळ व्यायाम शाळा विभागाने ‘टागोर नगर श्री’ शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले होते. या स्पर्धेत ताडदेव व्यायाम शाळेच्या अजय कडुने ‘टागोर नगर श्री’चा खिताब पटकावला. तर, पेतीत व्यायाम शाळेचा विजय गोडसे हा बेस्ट पोझर ठरला.

ॲम्युचर बॉडी बिल्डिंग असो. च्या मान्यतेने टागोर नगर तर्फे कबड्डी स्पर्धेनंतर ‘टागोर नगर श्री’चे राज्य स्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धेचे आयोजन केले होते. ही स्पर्धा विक्रोळी (पूर्व) येथील साईबाबा मंदिर शेजारील मैदानात पार पडली. या स्पर्धेत महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यातून नामवंत शरीर सौष्ठव स्पर्धकांनी भाग घेतला होता. या स्पर्धेचे बक्षीस वितरण स्थानिक नगरसेवक राजेश सोनावळे, मंडळाचे अध्यक्ष मनोज पवार, कार्याध्यक्ष गिरीश पवार, सचिव सुरेश परब, कोषाध्यक्ष महेंद्र भास्कर यांच्या उपस्थितीत पार पडला. विविध गटात घेण्यात आलेल्या या स्पर्धेतील लहान गटात प्रथम क्रमांक कौस्तुभ राणे, द्वितीय क्रमांक सुरेंद्र डांगवळ व तृतीय क्रमांक अविनाश राजपूत, मध्यम गटात प्रथम क्रमांक मुकुंद मांजरेकर, द्वितीय क्रमांक निहाल भुवड व तृतीय क्रमांक अविनाश गोरीवले, उंच गटात प्रथम क्रमांक शार्दूल हरियान, द्वितीय क्रमांक रेंडोल्फ डिसोझा व तृतीय क्रमांक अमित निकम यांनी पटकावला. तर, अधिक उंच गटात प्रथम क्रमांक अजय कडू, द्वितीय क्रमांक प्रशांत कांबळे व तृतीय क्रमांक कार्तिक शेलटकर यांनी पटकावला आहे.

# अमिनुल यांचे मंडळ बरखास्त

**। ढाका । वृत्तसंस्था ।**

मुस्तफिझूर रेहमान याला आयपीएलमधून बाहेर काढल्यानंतर बीसीसीआयविरुद्ध भूमिका घेणाऱ्या अमिनुल इस्लाम आणि त्यांच्या कार्यकारी संचालकांच्या निर्णयाची चौकशी करण्यासाठी बांगलादेश सरकारने पाच सदस्यांची चौकशी समिती नियुक्त केली होती. त्यांनी दिलेल्या अहवालानंतर अमिनुल इस्लाम यांचे सर्व मंडळ बरखास्त करण्यात आले. ३७ वर्षीय तमिम इक्बाल हे बांगलादेश क्रिकेट मंडळाचे सर्वात तरुण अध्यक्ष असणार आहेत.

# भारताच्या जोडीची ‘सुवर्ण’ नेमबाजी

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताच्या पलक व मुकेश नेलावल्ली या जोडीने नेमबाजी विश्वकरंडकात विश्वविक्रमासह सुवर्णपदकावर मोहर उमटवली आहे. या जोडीने १० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकारात चीनच्या हू केई-कियानशून या विश्वविजेत्या जोडीला पराभूत करताना सुवर्णपदकावर हक्क सांगितला आहे.



१० मीटर एअर पिस्तूल मिश्र सांघिक प्रकाराच्या पात्रता फेरीमध्ये कमालीची चुरस पाहायला मिळाली. तब्बल ४२ देशांतील खेळाडू या प्रकारात सहभागी झाले होते. त्यामधून फक्त चारच देशांच्या जोड्यांना अंतिम फेरीमध्ये वाटचाल करता आली. त्यात भारत, चीन, हंगेरी व अमेरिका या ४ देशांच्या जोड्यांचा समावेश होता. यावेळी चीनच्या जोडीने ५८६ गुणांसह पहिले स्थान, तर भारताच्या जोडीने ५८१ गुणांसह दुसरे स्थान मिळवले. त्यानंतर पात्रता फेरीमध्ये दुसरे स्थान मिळवलेल्या पलक व मुकेश नेलावल्ली या जोडीने अंतिम फेरीमध्ये ४८७ गुणांसह पहिल्या स्थानावर झेप घेतली. त्यामुळे भारतीय जोडीला सुवर्णपदकावर हक्क सांगता आला.

# स्टॅंड, प्रवेशद्वाराला दिग्गजांची नावे

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

माजी अष्टपैलू खेळाडू व माजी प्रशिक्षक रवी शास्त्री यांचे नाव देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच, स्टेडियमच्या तीन प्रवेशद्वारांना अनुक्रमे दिलीप सरदेसाई, एकनाथ सोलकर व डायना एडुलजी यांचे नाव देण्यात येणार आहे. त्याचा अनावरण सोहळा गुरूवारी (दि.९) वानखेडे स्टेडियममध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांच्या उपस्थितीत पार पडणार आहे.

मुंबई क्रिकेट संघटनेच्या एपेक्स काऊन्सिलच्या फेब्रुवारी महिन्यात झालेल्या बैठकीत स्टँड व प्रवेशद्वाराला दिग्गज खेळाडूंची नावे देण्याच्या प्रस्तावाला मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार आता पत्रकार कक्षाच्या खालील बाजूस असलेला लेव्हल वन स्टँड आता रवी शास्त्री यांच्या नावाने ओळखले जाणार आहे. तसेच गेट क्रमांक ३, ५ व ६ आता अनुक्रमे दिलीप सरदेसाई, डायना एडुलजी व एकनाथ सोलकर यांच्या नावाने ओळखले जाणार आहे. मुंबई क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष अजिंक्य नाईक म्हणाले की, महान व्यक्तींचा सन्मान करण्यासाठी आपण गुरूवारी एकत्र येत असताना, हा सोहळा मुंबई क्रिकेटसाठी एक अभिमानाचा क्षण असणार आहे.

# बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय खेळाडूंना संमिश्र यश

**। निंगबो । वृत्तसंस्था ।**

आशियाई बॅडमिंटन स्पर्धेच्या पहिल्या दिवशी दुहेरी विभागातील लढतींना सुरुवात झाली. यावेळी भारताच्या दोन जोड्यांना पराभवाचा सामना करावा लागला. मात्र, ध्रुव कपिला-तनीषा क्रॅस्टो या जोडीने प्रतिस्पर्धी जोडीवर विजय मिळवत आपले आव्हान कायम राखले. त्यामुळे भारतीय खेळाडूंना संमिश्र यशाचा सामना करावा लागला.



ध्रुव कपिला व तनीषा क्रॅस्टो या जोडीने विजयाला गवसणी घालून दिलासा दिला. ध्रुव कपिला-तनीषा क्रॅस्टो या जोडीने पी. होर्बानल्यूकीट- बेनयापा एमसार्ड या थायलंडच्या जोडीचे कडवे आव्हान २१-१४, ११-२१, २१-१५ असे तीन गेममध्ये परतवून लावले. ५१ मिनिटांच्या झुंजीनंतर भारतीय जोडीने विजयावर मोहर उमटवली. सलामीच्या लढतीत रोहन कपूर-गद्दे ऋत्विका शिवानी या भारतीय जोडीला गोह सून हूट-लेई शेवोन जेमी या मलेशियन जोडीकडून १३-२१, १९-२१ अशी हार पत्करावी लागली. त्यामुळे या भारतीय जोडीचा ३४ मिनिटांमध्ये पराभव झाला. त्यानंतर अशीथ सूर्या-अमृता प्रमुथेश या भारतीय जोडीचाही पहिल्या फेरीच्या लढतीत पराभव झाला. मलेशियाच्या वोंग टीएन की व लिम चिऊ सिएन या जोडीने भारतीय जोडीला २१-१६, ५ २१-१५ असा निराशेचा सामना करावा लागला. या भारतीय जोडीचा ३१ मिनिटांमध्ये पराभव झाला.

‘विजयाच्या नव्या पर्वाची’ दमदार सुरुवात | अनुभवी तज्ज्ञांवर निवडीची जबाबदारी

# महाराष्ट्र खो-खो ला नवी दिशा

**। पुणे । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र राज्य खो-खो असो. ने २०२६-२७ हंगामासाठी निवड समिती व राष्ट्रीय संघ प्रशिक्षकांची घोषणा करत क्रीडा क्षेत्रात नवा उत्साह निर्माण केला आहे. राज्य अजिंक्यपद व निवड चाचणी स्पर्धांसाठी अनुभवी आणि कसलेल्या तज्ज्ञांवर जबाबदारी सोपवण्यात आल्याने आगामी स्पर्धांमध्ये महाराष्ट्राचा दबदबा कायम राहील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.



या महत्त्वपूर्ण निर्णयाची घोषणा सरचिटणीस डॉ. चंद्रजीत जाधव यांनी पुणे येथे पार पडलेल्या विशेष सर्वसाधारण सभेत केली. यावेळी कार्याध्यक्ष सचिन गोडबोले, खजिनदार ॲड. गोविंद शर्मा तसेच इतर पदाधिकारी उपस्थित होते. विविध वयोगटांतील खेळाडूंची निवड, त्यांचे मार्गदर्शन आणि राज्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघांची उभारणी यासाठी या समित्यांवर मोठी जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

यावेळी पुरुष व महिला गटासाठी निवड समितीत अनुभवी सदस्यांची निवड करण्यात आली आहे. या समितीत सोमनाथ स्वामी, तुषार मोरे, रविराज परामने आणि रत्नराणी कोळी यांचा समावेश असून, त्यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यातील सर्वोत्तम खेळाडूंची निवड होणार आहे. योग्य निवड, योग्य मार्गदर्शन आणि सातत्यपूर्ण मेहनत या त्रिसूत्रीवर आधारित ही निवड प्रक्रिया महाराष्ट्राच्या खो-खो संघांना अधिक सक्षम बनवणार आहे.

### नवोदित प्रतिभेला संधी

कुमार व मुली गटासाठी निवड समितीत श्रीरंग बनसोडे (सोलापूर), विशाल पाटील (जळगाव), यतीश आक्रे (पालघर) आणि नंदिनी धुमाळ (मुंबई) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या समितीमार्फत उदयोन्मुख खेळाडूंना योग्य व्यासपीठ मिळणार असून, राज्यासाठी नवी प्रतिभा घडवली जाणार आहे.

### भविष्यातील स्टार्सची निवड

किशोर व किशोरी गटासाठी अमोल चव्हाण (जालना), पंकज चवंडे (रत्नागिरी), रमेश लव्हाट (अहिल्यानगर) आणि तृप्ती गाडगीळ अग्रवाल (पुणे) यांची निवड समितीत नियुक्ती करण्यात आली आहे. या गटातील खेळाडूंमध्ये असलेली ऊर्जा आणि क्षमता योग्य दिशेने विकसित करण्यासाठी ही समिती महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

# दोन सुवर्णकाळांची एकाच खेळपट्टीवर भेट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारतीय क्रिकेटमधील दोन सुवर्णकाळांची एकाच खेळपट्टीवर भेट झाल्याचा व्हीडिओ सध्या सोशल मिडीयावर पाहायला मिळत आहे. १९८३चे विश्वविजेते कर्णधार कपिल देव आणि ९३ वर्षीय ज्येष्ठ क्रिकेटपटू चंदू बोर्डे यांचा एक अत्यंत हृदयस्पर्शी व्हिडिओ चाहत्यांचे लक्ष वेधत आहे. वय हा फक्त एक आकडा असून क्रिकेट हे दिग्गजांच्या कसे रोमारोमात मुरल आहे, याचा प्रत्यय या व्हीडिओमधून येत आहे. हा दुर्मिळ क्षण पाहून क्रिकेटप्रेमींच्या जुन्या आठवणींना उजाळा मिळाला आहे.

ऐतिहासिक पुना क्लब लिमिटेडच्या क्रिकेट मैदानाच्या उद्घाटन सोहळ्यासाठी हे दोन्ही दिग्गज उपस्थित होते. या क्लबने आपल्या क्रीडा प्रवासात एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून, नव्याने विकसित केलेल्या जागतिक दर्जाच्या वाळू-आधारित क्रिकेट मैदानाचे भव्य उद्घाटन करण्यात आले. या कार्यक्रमाला क्रिकेटचे दिग्गज कपिल देव आणि भारताचे माजी खेळाडू चंदू बोर्डे यांच्यासह अनेक मान्यवरांची उपस्थिती लाभली. या नव्या मैदानावर कपिल देव व चंदू बोर्डे खेळण्यासाठी उतरले. ६७ वर्षीय कपिल देव यांनी ९३ वर्षीय चंदू बोर्डे यांना गोलंदाजी केली. चंदू बोर्डे अगदी पारंपरिकरणे बॅटने मार्किंग करत फलंदाजीसाठी सज्ज झाले. वयाची ९३ वर्षे ओलांडली असली तरी बॅटची पकड आणि क्रिकेटची ओढ आजही तशीच असल्याचे दिसले. चंदू बोर्डे यांनी खुद्द हरियाणा हुर्रिकेन कपिल देव यांच्या गोलंदाजीवर सुंदर फटके खेळले. दुसऱ्या चेंडूवरचा कव्हर ड्राईव्ह तर कमाल होता. या सोहळ्यासाठी उपस्थित असलेल्या चाहत्यांनीही या सुवर्णक्षणाचा आनंद घेत दोन्ही दिग्गजांचे कौतुक केले.

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक सौ.सुप्रिया पाटील यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ । RGD/016/2026-2028
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)